शुक्रवार, ८ जुलै २०२२

राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ३५१
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## देशात वाढतोय ओमायक्रॉनचा नवा उपप्रकार



**नवी दिल्ली** : भारतासह इतर काही देशांमध्ये कोरोनाच्या ओमायक्रॉनच्या व्हेरिएंटचा एक नवीन उपप्रकार आढळत आहे, अशी माहिती जागतिक आरोग्य संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे. जागतिक आरोग्य संस्थेचे महासंचालक टेड्रोस अधानोम गेब्रेयसस यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले, गेल्या दोन आठवड्यात कोरोनाच्या जागतिक स्तरावर नोंदवलेल्या केसेसमध्ये जवळपास ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. युरोप आणि अमेरिकेत, बीए ४ आणि बीए ५ या व्हेरिएंटची रुग्णसंख्या वाढत आहे, तर भारतासह इतर देशांमध्ये ओमायक्रॉनचा बीए २.७५ हा उपप्रकार आढळून येत आहेत. हा उपप्रकार रोगप्रतिकार क्षमता कमी करतो का किंवा हा किती घातक आहे, हे सांगणे सध्या कठीण आहे. आम्ही त्याचा अभ्यास करीत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

अंतरंग

नवी मुंबईत लवकरच होणार मेडिकल कॉलेज/२

रायगड वनविभाग करणार पाच लाख २५ हजार वृक्षलागवड/५

पुण्याच्या तनिष्क कदमची 'सुवर्ण' कामगिरी/८

# उद्धव ठाकरेंची शिवसेना फुटीच्या दिशेने

## ठाणे व नवी मुंबईतील नगरसेवक शिंदे गटात दाखल

### राष्ट्रपती निवडणुकीबाबतही मतभेद

**मुंबई : प्रतिनिधी**

देशात राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक होऊ घातली आहे. विरोधकांनी यशवंत सिन्हा यांना राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार घोषित केले आहे, तर एनडीएने द्रौपदी मुर्मू यांना उमेदवारी दिली आहे. उद्धव ठाकरे यांचे खासदार द्रौपदी मुर्मू यांना मतदान करण्याची मागणी शिवसेनेला केली आहे. याचसोबत ठाणे व नवी मुंबईतील बहुसंख्य नगरसेवकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना समर्थन दिल्याचे जाहीर केले आहे. यामुळे शिवसेनेमध्ये पडलेली फूट आणखीनच रुंदावण्याची शक्यता आहे.

शिवसेना आमदारांच्या बंडामुळे उद्धव ठाकरे यांचे मोठे नुकसान झाले, तसेच शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने मिळून स्थापन केलेले महाविकास आघाडी सरकारही कोसळले. मुंबई दक्षिण मध्यचे खासदार राहुल शेवाळे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याची मागणी केली आहे. शेवाळे यांनी उद्धव ठाकरे यांना इतर खासदारांना मुर्मू यांना पाठिंबा देण्याचे निर्देश द्यायला सांगितले. यासंदर्भात शेवाळे यांच्या वतीने पत्रही सादर करण्यात आले आहे.



शिवसेनेचे काही खासदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाशी हातमिळवणी करू शकतात, असा दावा शिंदे गटाकडून करण्यात येत आहे. ठाणेदेखील उद्धव ठाकरेंच्या हातातून निसटताना दिसत आहे. महानगरपालिकेचे ६६ नगरसेवकांनी एकनाथ शिंदेंना समर्थन दिले आहे. या नगरसेवकांनी एकनाथ शिंदेंची भेट घेतली आणि याबाबत घोषणा केली. ठाण्यानंतर पुढील काही तासांतच नवी मुंबई महापालिकेत शिवसेनेला खिंडार पडले आहे. नवी मुंबईतील ३० नगरसेवकांनी एकनाथ शिंदेंना पाठिंबा जाहीर केला आहे. विजय चौगुले यांच्या माध्यमातून शिंदे गटाला पाठिंबा देण्यात आला आहे.

याबाबत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अद्याप कोणतेही उत्तर दिलेले नाही. त्यामुळे आता राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीवरूनही शिवसेनेत पडलेली फूट आणखीनच रूंदावण्याची शक्यता आहे.

### माजी खासदार आनंद अडसूळ यांचा राजीनामा



शिवसेनेचे माजी खासदार आनंद अडसूळ यांनी गुरुवारी (दि. ७) आपला राजीनामा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे दिला आहे. अडचणीच्या काळात उद्धव ठाकरे यांनी साधी विचारपूसही केली नाही, याची खंत त्यांनी व्यक्त केली.


### १२ खासदार शिंदे गटासोबत असल्याचा दावा

शिंदे समर्थक आमदार गुलाबराव पाटील यांनी बुधवारी (दि. ६) १२ खासदार लवकरच पक्ष बदलतील असा दावा केला होता. ५५ पैकी ४० आमदार आणि १८ पैकी १२ खासदार आमच्यासोबत आहेत. मी चार खासदारांना भेटलो आहे. २२ माजी आमदारही आमच्यासोबत आहेत, असे जळगावात पाटील म्हणाले होते.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे मंत्रालयातून काम सुरू



**मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. ७) मंत्रालयातील आपल्या दालनातून कामकाजाला प्रारंभ केला. त्यांनी लगेचच विविध विषयांवरील बैठकांना उपस्थित राहून अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे, वडील संभाजी शिंदे, मुलगा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, सून वृषाली शिंदे, नातू रुद्रांश उपस्थित होते. काही आमदारांनी पुष्पगुच्छ देऊन मुख्यमंत्र्यांना सदिच्छा दिल्या. प्रथम मुख्यमंत्री शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन केले.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

# नवीन शैक्षणिक धोरणांमुळे विद्यार्थ्यांना विविध पर्याय

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे करिअर शिबिरात मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) रायगड विभागाच्या वतीने दहावी, बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिर भरारी २०२२ हा कार्यक्रम गुरुवारी (दि. ७) झाला. शिबिराचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत आणि महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते झाले.

या वेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणांमुळे वेगवेगळे पर्याय आपल्या समोर उपलब्ध आहेत. आपण ज्या क्षेत्रात जाणार आहोत, त्या क्षेत्रातील आव्हानांची माहिती असणे गरजेचे आहे. आयुष्यात मार्गदर्शन करणारे खूप असतात मात्र आपण कोणाचे मार्गदर्शन घ्यायचे हे महत्त्वाचे आहे, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.



शिबिरासाठी वरिष्ठ समन्वयक दीपक पाटेकर, शिवव्याखाते, लेखक व करिअर मार्गदर्शक प्रशांत देशमुख, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, एमकेसीएलचे कोकण विभाग समन्वयक जयंत भगत, रायगड विभाग समन्वयक मंगेश जाधव, सिद्धेश गोसावी यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

एमकेसीएलचे वरिष्ठ व्यवस्थापक दीपक पाटेकर यांनी प्रत्यक्ष कार्यानुभवातून मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

मार्गदर्शक प्रशांत देशमुख यांनी, पुरंदरचा तह, येसाजी, नेताजी, तानाजी, बाजी, रामजी यांच्या त्यागातून नुकतेच स्वराज्य लुकलुकतेय असे वाटत असताना मिर्जा राजा जयसिंग आला आणि २३ गड त्याच्या झोळीत टाकावे लागले आणि कैदेत रहावे लागले. त्या वेळी महाराजांच्या शौर्याची आठवण करावी. आपल्यासमोरील संकट लहान वाटेल आणि संघर्षाची प्रेरणा मिळेल, असे सांगितले.

## निवडक


### ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांचा राजीनामा

**ब्रिटन** : ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी अखेर गुरुवारी (दि. ७) राजीनामा दिला. सेक्स स्कँडलमध्ये अडकल्यानंतर जॉन्सन यांची प्रतिमा खराब झाली होती. महिनाभरापूर्वी झालेल्या अविश्वासदर्शक ठरावाच्या प्रस्तावात त्यांनी खूर्ची वाचवली, पण गेल्या ४८ तासांमध्ये ५०पेक्षा जास्त मंत्र्यांनी राजीनामा दिल्याने त्यांना पद सोडावे लागले.

### राज्यात आणखी चार दिवस मुसळधार पाऊस

**पुणे** : राज्यात आणखी चार दिवस हवामान खात्याने मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. कोकण, मध्य महाराष्ट्राच्या काही भागात आगामी चार दिवस अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे, तर मराठवाडा आणि विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यालाही रेड अलर्ट सांगण्यात आला आहे.

# टॅगिंग केलेल्या 'हुमायू'ची परराज्यात भरारी



**नागपूर : प्रतिनिधी**

हजारो किलोमीटरचा प्रवास करून स्थलांतरित पक्षी हिवाळ्यात भारतात येतात. मुंबईच्या ठाणे खाडी किनारपट्टीला भेट देणाऱ्या हुमायू नावाच्या फ्लेमिंगोने अवघ्या ३१ तास ५४ मिनिटांत महाराष्ट्र ते गुजरात असा प्रवास केला आहे.

उपग्रह टॅगिंग केलेला हुमायूने वसईत आठ तास तर गुजरातमधील केनक्रेजमध्ये तासाभराची विश्रांती घेत भावनगर गाठले. त्यामुळे त्याचा पुढचा प्रवास आणि विश्रांतीचा कालावधी याचा अभ्यास बीएनएचएससाठी (बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी) महत्त्वाचा ठरणार आहे.

भारतीय उपखंडातील फ्लेमिंगोचे प्रजनन आणि प्रजनन नसलेल्या ठिकाणी त्याचे स्थलांतरणाचे रहस्य उलगडण्यासाठी बीएनएचएसने राज्यात पहिल्यांदा मुंबई येथे रिंगिंग आणि उपग्रह टेलिमेट्री अभ्यासाचा प्रकल्प हाती घेतला. त्याअंतर्गत सहा फ्लेमिंगोंना जानेवारी ते एप्रिल या कालावधीत सौरऊर्जेवर चालणारे जीपीएस-जीएसएम रेडिओ टॅग लावण्यात आले. या सहाही फ्लेमिंगोंना पक्ष्यांवर काम करणाऱ्या अभ्यासकांची नावे देण्यात आली. त्यातील हुमायू या फ्लेमिंगोने जून महिन्यात ३१ तास ५४ मिनिटांचा प्रवास करीत थेट गुजरात गाठले. २८ जूनला रात्री १० वाजून २८ मिनिटांनी त्याने ठाणे खाडी सोडली. तासाभरात तो वसईला पोहचला.

# दिघी पोर्टचे काम जलदगतीने सुरू करणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

बल्क ड्रग पार्कची सुरुवात दिघी पोर्टतून सुरू करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. ७) झालेल्या औद्योगिक कॉरिडॉर प्रकल्पाच्या अपेक्स ॲथॉरिटीच्या पहिल्या बैठकीत दिली. मुख्यमंत्री शिंदे यांनी केलेल्या सूचनेला पीएम गतीशक्ती योजनेंतर्गत चालना देण्यात येईल आणि दिघी पोर्टबाबत विशेष आढावा ऑक्टोबरपर्यंत घेतला जाईल, अशी ग्वाही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी या वेळी दिली.



या बैठकीत केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, निती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी, उद्योग मंत्री, केंद्रीय सचिव आदी ऑनलाइन उपस्थित होते, तर मंत्रालयातून मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अतिरिक्त मुख्य सचिव बलदेव सिंह, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनबलगन, अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, औरंगाबाद इंडस्ट्रीयल टाऊनशिप कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुरेश काकाणी आदी उपस्थित होते.

सध्या राज्यातील टेक्सटाइल पार्क, मेडिकल पार्क आणि बल्क ड्रग पार्क हे प्रस्तावित असून या पार्क्सला केंद्र शासनाने लवकरात लवकर मान्यता दिल्यास या पार्क्सचे काम जलद गतीने सुरू होऊन राज्याला आणि पर्यायाने केंद्रालाही मोठा फायदा होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दिघी-माणगाव औद्योगिक क्षेत्रदेखील विकसित करण्यात येत असून महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणाकडून त्वरित मदत झाल्यास विकासाला चालना मिळेल. याठिकाणी ८५ टक्के जमीन संपादन पूर्ण झाले आहे. कराराची तांत्रिक प्रक्रिया केंद्राकडून लवकर पूर्ण झाली, तर तीन महिन्यांत उर्वरित भूसंपादन पूर्ण करता येईल, असे सांगून बिडकिन ते पैठण मार्गाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून गतीने व्हावे, अशी सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी केली.

# रायगडात पावसाचे धुमशान कायम


### मुंबई-पुणे जुना महामार्ग जलमय

### आपटा गावात शिरले नदीचे पाणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल्या तीन दिवसांपासून रायगड जिल्ह्यात पावसाचे धुमशान सुरू असून पाताळगंगा व कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासन सज्ज झाले असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पाताळगंगा नदीचे पाणी वाढल्याने जुन्या मुंबई-पुणे महामार्ग पाण्याखाली गेला. यामुळे येथील वाहतूक रोखण्यात आली होती. आपटा गाव हे नदीच्या काठावर असल्याने मुसळधार पावसामुळे गावात पाणी शिरले आहे. पेण



तालुक्यातील बेलवडे येथील दौलत माया पवार (वय ६०) हे मंगळवारी (दि. ५) मासेमारी करण्यासाठी गेले असता पावसाच्या पाण्यात वाहून गेले. दौलत पवार यांना शोधण्यात प्रशासनाला यश आले नाही. त्यांना शोधण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

रोहा तालुक्यातही जोरदार पावसामुळे कुंडलिका नदी भरून वाहत असून अष्टमी जुना पूल वाहतुकीसाठी बंद आहे.

### नेरळच्या उल्हास नदीत एक जण वाहून गेला

**कर्जत** : नेरळनजीकच्या ममदापूर रेल्वेफाटकाजवळील नाल्यावर मासेमारी करण्यासाठी गेलेला एक जण गुरुवारी (दि. ७) सायंकाळी उल्हास नदीत वाहून गेला. नेरळ परिसरातील दामत रेल्वेफाटकाच्या अलीकडे वाहणाऱ्या नाल्यात एक जण मासेमारी करीत असताना नाल्यातून उल्हास नदीमध्ये वाहून गेला. ममदापूर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास ही गोष्ट आल्यानंतर त्यांनी त्याला वाचवण्यासाठी धाव घेतली, परंतु पाण्याचा वेग इतका होता की, काही वेळातच तो वाहून गेला. हा इसम कोण आहे? याबद्दल काहीच समजले नसून नेरळ पोलीस घटनास्थळी पोहचले.

# पनवेल मनपाच्या शेवटच्या महासभेत सदस्य भावूक

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेत निवडून आलेल्या ७३ सदस्यांची पहिल्या पंचवार्षिकमधील शेवटची महासभा बुधवारी (दि. ६) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात घेण्यात आली. या वेळी सर्व सदस्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. सभेनंतर नगरसेवकांच्या निरोप समारंभ झाला. या वेळी अनेक सदस्य पाच वर्षांतील अनुभव सांगताना भावूक झालेले दिसले.

पनवेल महानगरपालिकेची स्थापना १ ऑक्टोबर २०१६ रोजी झाली. महानगरपालिकेची पहिली महासभा १० जुलैला झाली होती. बुधवारी महापालिकेची ५०वी महासभा घेण्यात आली. महासभेत १६ विषय मंजूर करण्यात आले. सभेचे कामकाज संपल्यावर सर्वांचा एकत्र फोटो काढण्यात आला. भोजनानंतर, पुन्हा सभागृहात आलेल्या सदस्यांनी पाच वर्षांत आलेले अनुभवांचे कथन निरोपाच्या कार्यक्रमात केले.

महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी, सब का साथ, सबका विकास हेच मी सुरुवातीला सांगितले होते. त्याचा प्रत्यय मला सभागृहात आल्याचे सांगितले. पाच वर्षांत विकासाची अनेक कामे केली. झोपडपट्ट्यांचा विकास, माता-बाल संगोपन केंद्रासाठी सिडकोकडून भूखंड, महिलांच्या आरोग्यासाठी शिबिर, मुलींना गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण, छत्रपती शिवाजी चौकातील सुशोभिकरण, क्रिकेट प्रशिक्षण केंद्र यांसारखी कामे मार्गी लागली, स्वच्छता सर्वेक्षणात मिळालेले बक्षीस याचा नक्कीच अभिमान वाटतो. महिलांसाठी हक्काचे म्हणून महिला बालसंगोपन केंद्राच्या

### कथन केले पाच वर्षांतले अनुभव



कामाचा मी पाठपुरावा केला, ते लवकरात लवकर पूर्ण करा, असे सांगून सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे व तुम्ही सर्व सदस्यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले. महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, त्यांचे सहकारी व कर्मचाऱ्यांनी त्यासाठी घेतलेली मेहनत यामुळे विकासकामे करणे शक्य झाले. लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी दोनदा संधी दिली त्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन आणि सर्व सदस्यांचे आभार मानले. उपमहापौर सीताताई पाटील आणि स्थायी समिती सभापती ॲड. नरेश पाटील, आयुक्त गणेश देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले.

सभागृह नेते परेश ठाकूर यांनी, आयुक्त गणेश देशमुख यांचे मनापासून आभार मानले. शहरी भागाबरोबरच नव्याने महापालिकेत सहभागी झालेल्या ग्रामीण भागाच्या विकासासाठीही आम्ही प्रयत्न केले. पनवेलमधील युवापिढीसाठी अभ्यासिका, आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला. पनवेल शहराला जागतिक किर्तीचे शहर बनविण्यासाठी यापुढेही प्रयत्न केला जाणार असल्याचे सांगितले. आपल्याला निवडून दिलेल्या, आपल्यावर विश्वास ठेवलेल्या पनवेलकरांचे, महापालिकेच्या सर्व अधिकाऱ्यांचे, महापौर, विरोधी पक्षनेते, नगरसेवक या सर्वांचे आभार मानले.

आयुक्त गणेश देशमुख यांनी, आजवर काम करताना सदस्यांचे आलेले अनुभव सांगितले. सभागृह नेते परेश ठाकूर यांचे विशेष कौतुक केले. आपल्या कारकिर्दीत असा सभागृह नेता पाहिला नसल्याचे सांगितले.

# शिवसेना म्हणजे भरकटलेले जहाज

## ▌भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना म्हणजे आता भरकटलेले जहाज झाले आहे. तसेच राज्यात शिवसेनेची अवस्था आता काँग्रेससारखी झाली असल्याची टीका माजी मंत्री आणि भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात नवे सरकार स्थापन झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्ष प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून मुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या समर्थकांवर आरोप सुरुच आहे. या मुळे आता शिंदे समर्थक आमदारांनी रोखठोकपणे विरोधकांवर भूमिका मांडायला सुरुवात केली आहे. सत्तांतर नाट्यानंतर जवळपास पंधरा दिवसांनी आपापल्या मतदारसंघात परतलेल्या या आमदारांनी बंडखोरीमागचे कारण सांगताना शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनाच जबाबदार धरले आहे. तसेच पक्षप्रमुखांकडे वारंवार हे गाऱ्हाणे मांडले होते, असेही ते म्हणाले. शिंदेगटाने शिवसेनेला मोठं धक्कातंत्र दिले आहे. यामुळे शिवसेनेकडून त्यांच्यावर सातत्याने टीका होत आहे. माजी मंत्री आणि भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनीही शिवसेनेवर टिका केली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी शिंदे समर्थकांबाबत घेतलेली भूमिका त्यातच, शिवसेनेकडून खासदार भावना गवळी यांची पक्षाच्या लोकसभा प्रतोद पदावरुन केलेली हकालपट्टी आणि आनंदराव अडसूळ यांनी शिवसेना नेतेपदाचा दिलेला राजीनामा, यामुळे शिवसेनेला धक्क्यावर धक्के दिले जात आहेत. त्यातच राधाकृष्ण विखेपाटील यांनी शिवसेनेला काँग्रेसची उपमा दिली आहे. तसेच शिवसेनेत फक्त बेताल वक्तव्ये करणारे प्रवक्तेच शिल्लक राहतील, असेही विखे पाटील म्हणाले आहेत.





याबरोबर शिवसेनेची काँग्रेसपेक्षा वेगळी अवस्था होईल, असे मला वाटत नाही. आज शिवसेना पक्षाच्या नेतृत्वावर लोकांचा विश्वास राहिला नाही. आता उरलेल्या आमदारांपैकी आणखी काही आमदार बाहेर पडण्याची शक्यता आहे, असे भाकित विखे पाटील यांनी व्यक्त केले. या वेळी त्यांनी उद्धव ठाकरे, संजय राऊत आणि शिवसेनेवर जोरदार टीका केली आहे.

# सानपाडा रेल्वे स्थानकात पूर्वेकडे तिकीट खिडकी सुरू करा

## भाजपचे सुनील कुरकुटे यांचे रेल्वे प्रबंधकांना पत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा रेल्वे स्थानकात पूर्वेकडे तत्काळ तिकीट खिडकी सुरु करण्याची मागणी नवी मुंबई महानगर पालिकेचे 'ड'प्रभाग समितीचे माजी सदस्य सुनील कुरकुटे यांनी गुरुवारी (दि. १४) रेल्वे स्टेशन प्रबंधकांकडे लेखीपत्राद्वारे केली आहे.



सध्या सानपाडा रेल्वे स्थानकात फक्त एकाच बाजूला म्हणजे पश्चिमेकडे तिकीट खिडकी सुरु आहे. रेल्वेचा प्रवास हा जलद आणि स्वस्त असल्याने पश्चिमेकडील खिडकीवर तिकीट काढण्यासाठी प्रवाशांची मोठी झुंबड उडालेली बघायला मिळते. एकाच बाजूला तिकीट खिडकी सुरु असल्याने प्रवाशांना तिकीट काढण्यासाठी रांगेत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे प्रवाशांचा वेळ फुकट वाया जात असल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यातच मुसळधार पाऊस पडत असल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहे. त्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन सानपाडा रेल्वे स्थानकात आता पूर्वेकडे बंद असलेल्या तिकीट खिडक्या तत्काळ कायमस्वरूपी सुरु कराव्यात आणि प्रवाशांना दिलासा द्यावा अशी मागणी भाजपचे सुनिल कुरकुटे यांनी रेल्वे प्रशासनाला पत्रातून केली आहे.

# लवकरच नवी मुंबईत मेडिकल कॉलेज सुरु

## ▌केंद्रीय आरोग्य विभागाची मान्यता; आमदार मंदा म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील नागरिकांना अद्ययावत वैद्यकीय सेवा सुविधा मिळाव्यात यासाठी मागील आठ वर्षापासून प्रयत्न सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी तत्कालीन आयुक्त व तत्कालीन वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांच्या माध्यमातून राज्य शासनाकडे सातत्याने मागणी सुरु होती. याला यश आले असून नवी मुंबई मनपास पदव्युत्तर पदवी मेडिकल कॉलेज सुरु करण्यास केंद्रीय आरोग्य विभागाने मान्यता दिली असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

नवी मुंबई मनपास केंद्रांनी मेडिकल कॉलेज निर्माण करण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिले असून यावेळी आमदार मंदाम्हात्रे यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त अभिजित बांगर यांचेही आभार मानले.



नवी मुंबई मनपाच्या वतीने पोस्ट ग्रॅज्युएट मेडीकल कॉलेज सुरु झाल्यास रुग्णालयास तज्ञ डॉक्टर उपलब्ध होणार आहेत. त्याचा लाभ सर्वसामान्य रुग्णांना मिळणार आहे. सद्यस्थितीत खासगी रुग्णालयात नागरीकांना उपचारासाठी फार मोठा खर्च येत आहे. मनपाच्या हॉस्पिटलमुळे नवी मुंबईतील नागरीकांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी यावेळी सांगितले. अत्यावश्यक रुग्णांना मुंबईला जाण्यासाठी वेळ जातो व रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशा रुग्णांना तातडीने उपचार मिळतील व त्यांचे जीव वाचतील. हायवेवरील होणाऱ्या अपघातातील रुग्णांनाही तातडीने उपचार देणे शक्य होईल. वैद्यकीय शिक्षण व उच्च शिक्षित डॉक्टरांची नागरिकांना वैद्यकीय सेवा देणारी नवी मुंबई महानगरपालिका ही महाराष्ट्रातील एकमेव महापालिका असेल. नियोजित मेडीकल कॉलेजसाठी प्रशासकीय व निवासी संकूल उभारण्यासाठी सिडको महामंडळाकडे जागेची मागणी करण्यात येणार आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयाची नोंदणी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे करण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करीत असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना यावेळी सांगितले.

दरम्यान, रुग्णालयात मेडीकल कॉलेज सुरु करण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ, वैद्यकीय तज्ञ उपलब्ध करून देण्यासाठी व त्यास आर्थिक सहाय्य मिळवून देण्यासाठी मी राज्य शासनाकडे मागणी करणार असून त्यास यश येईल असा विश्वास आमदार मंदा म्हात्रे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# महाड येथे आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष कार्यान्वित

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाड येथे पूर व दरडग्रस्त आपत्ती व्यवस्थापनाकरीता रायगड पोलीस दलाचे स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. कम्युनिटी हॉल, नवीन पोलीस वसाहत नवेनगर महाड येथे गुरुवारी (दि. ७) हा नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून रायगड पोलीस दल हे महाड विभाग पूरपरिस्थिती व दरडग्रस्त परिस्थितीमध्ये आपत्ती नियोजन करण्यासाठी सज्ज झाले आहे.

महाड येथील आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षामध्ये पोलीस आपत्ती नियोजनाकरीता तीन पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांमध्ये मध्ये तीन अधिकारी आठ पोलीस अंमलदार तसेच पाच पोलीस बोटमन व पाच पोलीस अंमलदार बोट चालविण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. तसेच एक पाच टनी वाहन, दोन पीसीआर वाहन, आठ मोटार सायकल असे सर्व अत्यावश्यक साहित्यांसह सज्ज आहे. महाड उपविभागामध्ये १४ सेक्टर व पोलादपूर विभागामध्ये पाच सेक्टर तयार करण्यात आलेले आहेत. प्रत्येक सेक्टरमध्ये दिवसरात्रो अशा पद्धतीने दोन प्रशिक्षित पोलीस अंमलदार वॉकीटॉकीसह सतर्क ठेवण्यात आलेले आहेत.

रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी ५ व ६ जुलै रोजी आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष महाड येथे भेट देवुन रायगड जिल्ह्यात सुरु असलेल्या मुसळधार पाऊस व रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाकडुन हाय अलर्ट जारी असल्याने आपत्ती नियंत्रण कक्षातील राखीव टिम, महाड व पोलादपूर विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची एकत्रित बैठक घेवुन त्यांना पुरविण्यात आलेल्या आपत्ती व्यवस्थापन साहित्यासह युद्धपातळीवर आपआपले कर्तव्यावर सतर्क राहण्याबाबत सुचना दिल्या. तसेच आपत्ती व्यवस्थापनाकरीता नेमण्यात आलेल्या अधिकारी व अंमलदार यांना अत्यावश्यक साधनसामुग्रीचे वाटप केले.

### नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

***अतिरिक्त जिल्हाधिकारी अमोल यादव, प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड तसेच तहसिलदार सुरेश काशिद यांनी आपत्ती नियंत्रण कक्षाला भेट देऊन मार्गदर्शन केले. सहा जुलै रोजी आमदार भरत गोगावले यांनी नियंत्रण कक्षाला भेट दिली व रेस्कू संदर्भात साहित्य पुरविणार असल्याबाबतचे आश्वासन दिले आहे. महाड व पोलादपूरमधील नागरिकांनी आपत्तीजन्य परीस्थितीत दुरध्वनी क्रमांक-०२१४५-२२४६०० मोबाईल क्रमांक ९७३००९२११४ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.***

## पेण नगर परिषद, पेण

## जाहीर निविदा सूचना सन २०२२-२३

पेण नगर परिषद, पेण, जि. रायगड यांजकडून खालील कामांसाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून टक्केवारी दराच्या सिलबंद निविदा द्विनोंद लिफाफा पद्धतीने मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | कामाची इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी रक्कम रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पेण नगरपरिषद हद्दीतील पिंपळडोह येथे जॅकवेलवर पत्र्याच्या शेडची दुरुस्ती करणे. | १९९०९९/- | २०००/- | ५००/- | १८० दिवस |
| ०२ | पेण नगरपरिषद हद्दीतील पिंपळडोह येथे जॅकवेल येथील G.I. पाईप बदलणे. | १९८८५७/- | २०००/- | ५००/- | १८० दिवस |
| ०३ | पेण नगरपरिषद हद्दीतील पिंपळडोह येथे जॅकवेल जवळ विट बांधकाम व पत्र्याच्या शेडचे बांधकाम करणे. | १७३४२५/- | २०००/- | ५००/- | १८० दिवस |
| ०४ | पेण नगरपरिषद हद्दीतील आंबेडकर प्राथमिक शाळेभोवती कंपाऊंड वॉल बांधणे, दुरुस्ती करणे व काँक्रीटीकरण करणे. | १९२११७/- | २०००/- | ५००/- | १८० दिवस |
| ०५ | पेण नगरपरिषद इमारतीच्या टॉयलेट पाईपची दुरुस्ती करणे व चेंबर बसविणे. | ६७६४६/- | २०००/- | ५००/- | १८० दिवस |
| ०६ | पेण नगरपरिषद हद्दीतील आंबेडकर चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ दुरुस्ती करणे. | ९६०६८/- | २०००/- | ५००/- | १८० दिवस |

**-: कामाच्या अटी व शर्ती :-**

०१. निविदा फॉर्मची विक्री कार्यालयीन वेळेत दिनांक ०८/०७/२०२२ ते दिनांक १५/०७/२०२२ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत.
०२. निविदा फॉर्म दिनांक १५/०७/२०२२ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.
०३. निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी दु. ५.३० वाजता अथवा कार्यालयाचे प्रशासकीय सोयीप्रमाणे उघडणेत येतील.
०४. नोंदणीकृत व्यक्ती /संस्था/कंपनीने ग्राह्य नोंदणीपत्राची प्रत निविदा मागविणेच्या अर्जासोबत दर्शविल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
०५. कामाचा अनुभव असेल अशाच व्यक्ती/संस्था/कंपनींना निविदा फॉर्म दिले जातील.
०६. निविदा द्विनोंद पद्धतीने सादर करणेच्या असून **लिफाफा क्र. १** मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र, मागील ३ वर्षाचे आयकर रिटर्नस, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, कामगार भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र, कामाचे अनुभवाचे दाखले, इसारा रक्कम भरल्याची पावतीची छायांकीत प्रत वगैरे कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तर **लिफाफा क्र. २** मध्ये स्वहस्ताक्षरात संपूर्ण भरलेला निविदा फॉर्म सादर करणेचा आहे.
०७. सशर्त निविदा नाकारली जाईल. कोणतीही एक निविदा स्विकारणेचा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
०८. कामासंबधी अतिरिक्त माहिती नगरपरिषदेचे बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.

**सही** XXX
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**

# गणेशोत्सवानिमित्त एसटीच्या ८५० गाड्यांचे आरक्षण

## ▌परतीच्या प्रवासाचे आरक्षणही सुरू; महामंडळाकडून यावर्षी जादा गाड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

एसटी महामंडळाने गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाण्यासाठी जादा गाड्या सोडल्या असून त्याच्या आरक्षणालाही सुरुवात झाली आहे. प्रवाशांनी १,३०० पैकी ८५० गाड्यांच्या आरक्षणाला प्रतिसाद दिल्याची माहिती एसटी महामंडळाकडून देण्यात आली. याबरोबरच परतीच्या प्रवासाचे आरक्षणाही सुरू झाले आहे. लवकरच गट आरक्षणासाठी एसटीच्या जादा गाड्या उपलब्ध करण्यात येणार आहेत.

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्या आरक्षित झाल्या असून एसटी महामंडळाने गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्यांसाठी २,५०० जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.



यातील पहिल्या टप्प्यात २५ ऑगस्टपासून सुटणाऱ्या १ हजार ३०५ जादा गाड्यांचे आरक्षण २५ जूनपासून सुरू झाले आहे. या जादा गाड्या मुंबई, ठाणे, पालघरमधून उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यात गणेशोत्सवासाठी २५ ते ३१ ऑगस्ट दरम्यान सुटणाऱ्या १,३०५ जादा गाड्यांपैकी ८५० बसच्या आरक्षणाला प्रवाशांकडून प्रतिसाद मिळत आहे. जवळपास तीन हजार आसने आरक्षित करण्यात आल्याची माहिती एसटी महामंडळाने दिली.

कोकणातून ५ ते ११ सप्टेंबर दरम्यान जादा गाड्या परतीचा प्रवास सुरू करतील. परतीच्या गाड्यांसाठी पाच जुलैपासून आरक्षणाला सुरुवात झाली आहे. महामंडळाने लवकरच ग्रुप आरक्षणही सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षी गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाण्यासाठी एसटी महामंडळाने २,२०० गाड्या सोडल्या होत्या.

### अन्य गाड्यांचे आरक्षण चार जुलैपासून

***गणेशोत्सवनिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुकर व्हावा यासाठी मध्य रेल्वेने ७४ विशेष फेऱ्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई, पुणे, नागपूर येथून सावंतवाडी, कुडाळ, मडगावसाठी या फेऱ्या सोडण्यात येणार आहेत. या गाड्यांचे तिकीट आरक्षण चार जुलैपासून सुरू झाले आहे.***

# पाचवी-आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा २० जुलैला; प्रवेशपत्रे उपलब्ध

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा २० जुलैला आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे परीक्षा परिषदेकडून शाळांच्या लॉग इनमध्ये उपलब्ध करून देण्यात आली असून, शाळांनी प्रवेशपत्र विद्यार्थ्यांना देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त शैलजा दराडे यांनी ही माहिती दिली.

पाचवी आणि आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा दरवर्षी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये होते. मात्र करोनाचा प्रादुर्भाव आणि टीईटी परीक्षेतील घोटाळा उघडकीस आल्याने परीक्षा परिषदेत पोलिसांकडून करण्यात येणारा तपास आदी कारणांमुळे परीक्षा लांबणीवर पडली. आता २० जुलैला राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे प्रवेशपत्र १ जुलैपासून संबंधित शाळेच्या लॉग इनमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे मुख्याध्यापकांनी प्रवेशपत्र डाऊनलोड करून त्याची मुद्रित प्रत काढून सर्व परीक्षार्थ्यांना तातडीने वितरीत करावे. तसेच परीक्षार्थी, पालक यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

परीक्षेसाठी परीक्षा केंद्र निश्चितीचे काम पूर्ण झालेले आहे. तर परीक्षेसाठी शिक्षणाधिकारी 'जिल्हा समन्वयक' तर गटशिक्षणाधिकारी, वॉर्ड ऑफिसर हे 'तालुका समन्वयक' म्हणून काम पाहणार आहेत. परीक्षेसाठी ३१ डिसेंबरपूर्वी सेवानिवृत्त होत नसलेले शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक किंवा पदवीधर शिक्षक यांची केंद्र संचालक म्हणून नियुक्ती करावी. केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक किंवा पदवीधर शिक्षक उपलब्ध नसल्यासच कार्यक्षम सेवाज्येष्ठ उपशिक्षकाची केंद्र संचालक म्हणून नियुक्ती करण्यात यावी. एकदा नियुक्त केलेल्या केंद्र संचालकांच्या नावात शक्यतो बदल करण्यात येऊ नये, तसेच उपकेंद्र संचालक, पर्यवेक्षक, शिपाई यांची नियुक्ती करण्यासंदर्भातील सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# उरणमध्ये आढळलेल्या मृतदेहाची ओळख पटली

**उरण : बातमीदार**

उरणमधील पिरवाडी समुद्र किनारी दर्गाच्या पाठीमागे एक मृतदेह आढळून आला. घटनास्थळी पोलीस कर्मचारी दाखल झाले. चौकशीअंती पोलीस कर्मचाऱ्यांना तपासात आढळले की, हा मृतदेह करंजा येथील हितेंद्र राजेंद्र म्हात्रे (३१) करंजा याचा आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या व्यक्तीचे नाव हितेंद्र राजेंद्र म्हात्रे वय ३१ वर्षे, व्यवसाय-नोकरी, (रा.साईनगर, द्रोणागिरी हायस्कूलच्या बाजूला, करंजा, तालुका उरण, जिल्हा रायगड) तसेच त्याचा बांधा मजबूत, उंची सहा फूट, रंग गोरा, अंगात टी शर्ट, नेव्ही ब्लू रंगाची जीन्स व रेनकोट असा त्याने पेहराव केलेला होता. ६ जुलै २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता घराबाहेर तो पडला आणि घरी परतलाच नाही. या बाबत हितेंद्र म्हात्रे हरविल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात त्याच्या कुटुंबियांनी केली होती. उरण समुद्रकिनारी दर्गाच्या पाठीमागे मिळालेले मृतदेहाचा रंग, रूप आदी सर्व माहिती उरण पोलीस स्टेशनमध्ये हरविलेल्या तक्रारीशी पूर्णपणे मिळती जुळती होती. हा मृतदेह हितेंद्र म्हात्रे याचाच असल्याची पोलिसांनी खात्री केली. दरम्यान, हितेंद्र म्हात्रे हा पोहण्यासाठी समुद्रात उतरला होता की, त्याने आत्महत्त्या केली किंवा कोणी त्याचा खून केला हे अद्याप समजू शकले नाही. या घटनेचा पुढील तपास उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो. नि. सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. ८ जुलै २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# सायबर चोरट्यांचा धुमाकूळ

**पनवेल : वार्ताहर**

इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या जगात ऑनलाइन फसवणूक सामान्य झाली आहे. दररोज अशी अनेक प्रकरणे समोर येत आहेत, ज्यामध्ये लोक ऑनलाइन फसवणुकीला बळी पडत आहेत. अशाच काही घटना पनवेल परिसरात घडल्या आहेत. यामध्ये कळंबोलीतील एका विवाहितेला अज्ञात सायबर चोरट्याने ७५ हजार रुपयांना गंडा घातला आहे. तर खारघरमध्ये एका व्यक्तीला ऑनलाईन खरेदी चांगलीच महागात पडली आहे. तब्बल चार लाख १० हजार रुपये या व्यक्तीच्या खात्यातून सायबर चोरट्याने परस्पर वळते केले आहे. वाढत्या डिजिटल व्यवहाराबरोबरच सायबर गुन्हेगार चांगलेच सक्रिय झाले आहेत. त्यामुळे ही सायबर गुन्हेगारी मोडीत काढण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे.

पहिल्या घटनेत ऑनलाइन कर्ज घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या कळंबोलीतील एका विवाहितेला अज्ञात सायबर चोरट्याने ७५ हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात सायबर चोरट्या विरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

फसवणूक झालेल्या महिलेने ऑनलाइन कर्ज घेण्यासाठी मोबाइलवर एक ॲप डाऊनलोड केले होते. त्यावेळी सायबर चोरट्याने दीड लाख रुपये कर्जासाठी पात्र असल्याचा मेसेज पाठवल्याने तिने ॲपमध्ये सर्व माहिती भरून कस्टमर केअरवर क्लिक केले. त्यामुळे तिच्या मोबाइलवर सायबर चोरट्याचे व्हॉट्सॲप सुरू झाले. चोरट्याने विवाहितेसोबत चॅटिंग करून दीड लाख रुपयांच्या कर्जासाठी दहा टक्के सर्व्हिस चार्जेस रक्कम प्रथम भरावी लागेल, असे सांगून तिला एक लिंक पाठवून दिली. विवाहितेने लिंकच्या माध्यमातून गुगल पेवरून १५ हजार रुपये पाठवून दिल्यानंतर कर्ज मंजूर झाल्याचा व रक्कम काढून घेण्याचा मेसेज तिला मिळाला. तिने पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता, सायबर चोरट्याने बँक खाते क्रमांक चुकीचा टाकल्याचे सांगून तो दुरुस्त करण्यासाठी दुसरा मोबाइल नंबर दिला. त्यानुसार विवाहितेने दुसऱ्या मोबाइलवर संपर्क साधला असता, सायबर चोरट्याने खाते क्रमांक दुरुस्त करण्यासाठी ३० हजार रुपये भरावे लागतील, असे सांगितले. विवाहितेने ही रक्कम फोन पे द्वारे भरल्यानंतर तिला कर्ज मंजूर झाल्याचा मसेज आला व ॲपवर जाऊन रक्कम ट्रान्स्फर करून घेण्यास सांगण्यात आले. विवाहितेने पवर पैसे ट्रान्स्फर करण्याचा प्रयत्न केला, मात्र पैसे ट्रान्स्फर न झाल्याने तिने चोरट्याला विचारणा केली असता. तिचे खाते बोगस असल्याचे सांगून कर्ज मंजुरीसाठी आणखी ४१,६६६ रुपये भरण्यास सांगण्यात आले. आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यानंतर विवाहितेने प्रथम नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडे व त्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## पनवेल परिसरात अनेक घटना

दुसऱ्या घटनेत खारघर भागात राहणाऱ्या एका व्यक्तीने अर्धा किलो काजू वर अर्धा किलो बदाम मोफत मिळविण्याच्या नादात चार लाख १० हजार रुपये गमावल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणात फसवणूक झालेल्या व्यक्तीला अज्ञात सायबर चोरट्याने अर्धा किलो काजू वर अर्धा किलो बदाम मोफत देण्याचा बहाणा करुन तक्रारदाराकडून क्रेडीट कार्डची माहिती घेऊन त्याच्या खात्यातून ४ लाख १० हजार रुपये परस्पर काढून घेतले आहेत. त्यामुळे खारघर पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

फसवणूक झालेले शरद बिबवे (वय ४९) हे खारघर, सेक्टर-३६ मध्ये राहण्यास असून ते मिनी बस चालवतात. सायबरचोरट्यांनी फसवणूक करण्यासाठी फेसबुकवर टाकलेली अर्धा किलो काजू वर अर्धा किलो बदाम मोफत देण्याची डी-मार्टची जाहिरात त्यांच्या निदर्शनास आली. अर्धा किलो काजू वर अर्धा किलो बदाम मोफत मिळणार असल्याने शरद बिबवे यांनी जाहिरातीवरून अर्धा किलो काजुची ऑर्डर बुक केली. तसेच त्यावर आपल्या क्रेडीट कार्डचा क्रमांक आणि सीव्हीव्ही नंबर टाकला. त्यानंतर ही जाहिरात बनावट असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यातून बिबवे बाहेर पडले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सायबर चोरट्याने डी-मार्टचा प्रतिनिधी असल्याचे भासवून बिबवे यांना संपर्क साधला. तसेच त्यांनी आदल्या दिवशी ऑनलाईन मागवलेले काजू आणि बदाम त्यांना घरपोच मिळतील असे सांगून त्यांच्या व्हॉटस्ॲपवर एक लिंक पाठवून दिली. तसेच हे ॲप डाऊनलोड करून पुढील खरेदीसाठीदेखील त्याचा वापर करता येईल, असे सांगितले. त्यामुळे बिबवे यांनी ही लिंक उघडून त्यात आपली सर्व माहिती भरल्यानंतर त्यांच्या क्रेडीट कार्डवरून १० हजार रुपये गेल्याचे त्यांना समजले. त्यामुळे बिबवे यांनी तत्काळ बँकेच्या हेल्पलाईनला संपर्क साधून सदर क्रेडीट कार्ड बंद करून घेतले, मात्र तोपर्यंत सायबर चोरट्याने त्यांच्या बँक खात्यातील एकूण चार लाख १० हजार रुपये काढून घेतले. त्यानंतर बिबवे यांनी खारघर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.



## आसूडगावात समाज मंदिर बांधण्यास 'स्थायी'ची मंजूरी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रातील आसूडगावमध्ये समाज मंदिर बांधण्यात येणार आहे. खिडुकपाडा गावात स्मशानभूमी मध्ये सुधारणा करण्यासह पनवेल शहरातील पाणीपुरवठा परिचलनासाठी मनुष्यबळ पुरवण्याचा निर्णय गुरुवारी (दि. ७) झालेल्या स्थायी समितीच्या सभेत घेण्यात आला. स्थायी समितीच्या विद्यमान सदस्यांची शुक्रवारी (दि. ८) शेवटची सभा होणार आहे.

पनवेल महापालिकेची स्थायी समितीची सभा गुरुवारी महापालिका कार्यालयात अध्यक्ष नरेश ठाकूर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला सभागृह नेते परेश ठाकूर, प्रकाश बिनेदार, जगदीश गायकवाड, संतोष शेट्टी, निलेश बावीस्कर, दर्शना भोईर, राजश्री वावेकर, संतोष भोईर, राजू शर्मा आदी उपस्थित होते. सभेत अजेंडावरील चारही विषयांना मंजूरी देण्यात आली.

या सभेत प्रभाग 'ब' मधील आसूडगाव येथे समाज मंदिर बांधण्यास व रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे, गटार व ड्रेनेज लाइन टाकणे यासाठी दोन कोटी आठ लाख ३४ हजार रुपयांची मे. ए. पी. कन्स्ट्रक्शनची निविदा मंजूर करण्यात आली. खिडुकपाडा गावातील गटाराचे काम व स्मशानभूमीत सुधारणा करण्यासाठी मे. साई कृपा कन्स्ट्रक्शनची ७५ लाख सात हजार रुपयांची निविदेला मंजूरी देण्यात आली. पनवेल शहरातील पाणीपुरवठा परिचलनासाठी तीन वर्षांकरिता मनुष्यबळ पुरवणे साठी मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. ली. ची सहा कोटी १३ लाख १५ हजार रुपयांच्या निविदा मंजूर करण्यात आली. मलनि:सारण वाहिन्यातील गाळा, कचरा काढन्यासाठी आवश्यक उपकरणे व मनुष्यबळ पुरवण्याला मे. पूर्वा एन्टरप्रायजेसला डिसेंबर २०२२ परिणत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**पनवेल महापालिकेत सहभागी झालेल्या शहरी भागा सोबतच ग्रामीण भागाचाही विकास करण्याला आम्ही प्राधान्य दिले असल्याने आजच्या स्थायी समितीच्या सभेत आसूडगावमध्ये समाज मंदिर बांधण्यास मंजूरी दिली आहे. याबरोबरच आसूडगावमधील रस्त्यांचे काँक्रिटीकरण करणे, गटार व ड्रेनेज लाइन टाकणे व खिडुकपाडामधील गटाराचे काम व स्मशानभूमीत सुधारणा करण्याची कामे मंजूर केली आहेत.**
**-ॲड. नरेश ठाकूर, अध्यक्ष, स्थायी समिती, पनवेल मनपा**



खारघर : भाजप नेते प्रभाकर घरत यांच्या सेक्टर ४ बेलपाडा येथील जनसंपर्क कार्यालयात पोलिओ लसीकरण राबविण्यात आले.

## पनवेलमध्ये होणार क्रीडासंकुल व बहुउद्देशीय सभागृह

■ महासभेत मान्यता; सभापती वृषाली वाघमारे यांच्या प्रयत्नांना यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील इच्छापूर्ती गणपती मंदिर पनवेल येथील अंतिम भुखंड क्र.३८८ मध्ये स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (क्रीडासंकुल) व बहुउद्देशीय सभागृह विकसित व्हावे, यासाठी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे यांनी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार बुधवारच्या महासभेत क्रीडासंकुल व बहुउद्देशीय सभागृहासाठी मान्यता मिळाली आहे.

महापालिका हद्दीतील इच्छापूर्ती गणपती मंदिर पनवेल येथील अंतिम भुखंड क्रमांक ३८८ मध्ये स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (क्रीडासंकुल) व बहुउद्देशीय सभागृहासाठी एकूण क्षेत्रफळ ५९८४ चौ. मीटर विकसीत करावे. त्यामध्ये तळमजला बहुद्देशीय सभागृह व पहिला मजला येथे बॅडमिटन कोर्टचा समावेश करावा, अशी सभापती ॲड. वृषाली वाघमारे यांनी मागणी केली होती. त्यानुसार बुधवारी झालेल्या पनवेल महापालिकेच्या महासभेत या कामाला मान्यता देण्यात आली.

या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स (क्रीडासंकुल) व बहुउद्देशीय सभागृहासाठी एकूण अंदाजित रक्कम ३.५० कोटी रुपये अपेक्षित असल्याचे पालिकेच्या गोषवाऱ्यात म्हटले आहे.

## ओवेपेठ विद्यालयात विद्यार्थी मंत्रीमंडळ निवडणूक उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर-ओवेपेठ येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात मंगळवारी (दि. ५) शालेय विद्यार्थी मंत्रीमंडळ निवडणूक कार्यक्रम उत्साहात झाला.

लोकशाहीमध्ये मतदार हे महत्त्वाची भूमिका बजावतात व योग्य उमेदवार निवडून देतात. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजान नागरिक असतात. त्यांना लोकशाही, निवडणूक, मंत्रीमंडळ, राजकीय पक्ष, नागरिकांची कर्तव्य व राज्य कारभार या सर्वांची माहिती व्हावी व प्रत्यक्ष निवडणूकीचा अनुभव मिळावा या उद्देशाने विद्यालयात विद्यार्थी मंत्रीमंडळ निवडणूक घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांमधून मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, पोलीस अधिकारी, शिपाई या पदावर विद्यार्थ्यांनी काम केले व स्वत: अनुभव घेतला. या निवडणूकीमध्ये इयत्ता दहावीमधून निशांत वसंत शेळके, इयत्ता नववीमधून पायल मुकेश राठोड व इयत्ता आठवीमधून हिना तौकीर शेख हे वर्गमंत्री म्हणून निवडून आले.

या निवडणूक प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर व मिलन पाटील यांनी काम पाहिले. श्री. जोगदंडे, श्री. खांदेकर व श्री. जाधव यांनी निवडणूक नियोजनाचे काम यशस्वीपणे केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, सचिव एस. टी. गडदे यांनी निवडून आलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.



### पनवेलमध्ये पावसाची रिपरिप

**पनवेल** : पावसाची संततधार गुरुवारी (दि. ७) सुरूच असल्याने पनवेल तालुक्यात दिवसभरात १४९ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे, तर उरण तालुक्यात १२० मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, गाढी नदी पात्राची सध्याची पाणी पातळी ३.८० मीटर इतकी आहे. पनवेल तालुक्यात महिनाभरात सरासरी पावसाची ९९५.२० नोंद झाली होती. उरण तालुक्यात आतापर्यंत ८३९ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. तर दिवसभरात १२० मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

## पेठाली येथील शाळेतून एलसीडी मॉनिटरची चोरी


**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात चोरट्याने तळोजा पाचनंद येथील रायगड जिल्हा परिषदेच्या पेठाली येथील प्राथमिक शाळेतील वर्ग खोल्यांचा कडी-कोयंडा तोडून ४२ इंची एलसीडी टीव्ही व डेल कंपनीचा मॉनिटर चोरून नेला. तळोजा पोलिसांनी या प्रकरणी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

पेठाली गावात जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा असून या शाळेतील पहिली व दुसरीच्या वर्गामध्ये ४२ इंची एलसीडी टीव्ही व मॉनिटर लावण्यात आले होते. सकाळी शाळेच्या शिक्षिका कुडये शाळेत गेल्या असता, शाळेतील व्हरांड्याचे ग्रिल खुले असल्याचे व वर्ग खोल्यांचा कडी-कोयंडा तुटल्याचे निदर्शनास आले.

आतमध्ये पाहणी केली असता, एलसीडी टीव्ही व मॉनिटर चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



उरण : भाजपच्या वतीने प्रखर भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती आमदार महेश बालदी यांच्या जनसंपर्क कार्यालयात बुधवारी झाली. उपस्थित भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, रायगड जिल्हा अल्पसंख्यांक अध्यक्ष जसिम गॅस, महेंद्र खाडे, यशवंत चौकेकर, प्रेम मढवी आदींसह कार्यकर्त्यांनी या वेळी अभिवादन केले.

## रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या उलवे, गणेशपुरी, कोंबडभुजे, तरघर येथील शाळेमध्ये वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या वेळी उलव्याचे माजी सरपंच एम. डी. खारकर, उपसरपंच जगदीश खारकर, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, गणेशपुरी ग्रामपंचायत सदस्य रामनाथ कोळी, मोरावे ग्रामपंचायत सदस्य वितेश म्हात्रे, तरघर स्कूल कमिटी अध्यक्ष शंकर मोहीते, उलवे स्कूल कमिटी अध्यक्ष शितल महेश सोमासे, मोहो येथील मच्छींद्र कोळी, युवा अध्यक्ष निलेश खारकर, ज्येष्ठ नेते गणेश सोमासे, युवा नेते प्रणय कोळी, स्वप्नील म्हात्रे, प्रदीप डोलनुर, बामणडोंगरी गाव अध्यक्ष नंदु ठाकूर, उलवे नोड उपाध्यक्ष शैलेश भगत, उलवे गाव अध्यक्ष दीलीप कोळी, युवा मोर्चा सरचिटणीस धिरज ओवलेकर, भरत म्हात्रे, आदर्श शिक्षण गायकवाड गुरुजी आदी उपस्थित होते.

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा उपक्रम



## सीकेटी महाविद्यालयात उद्या प्लेसमेंट ड्राईव्ह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या प्लेसमेंट कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या कॉमर्स रिसोर्स सेंटरमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतील वाणिज्य विद्याशाखेच्या पदवी आणि पदव्युत्तर पदवीधर उमेदवारांसाठी प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्लेसमेंट ड्राईव्ह ऑफशोअर इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या जुईनगर, नवी मुंबई (तुर्भे, एम.आय.डी.सी.) स्थित कंपनीच्या सहकार्यातून होणार असून, ह्यामध्ये कनिष्ठ लेखपाल पदासाठी भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. या प्रक्रियेसाठी बी.कॉम तथा एम.कॉम पदवी, ०-३ वर्षे अनुभव, लेखा क्षेत्राचे ज्ञान, टॅली आणि एम.एस. एक्सेलचे पर्यात्प कौशल्य असणारे उमेदवार सहभागी होऊ शकतात. इच्छुक उमेदवारांना प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी होण्यासाठी या लिंकद्वारे https://forms.gle/Ck1c8ZSySRWxM2z49 नोंदणी करणे बंधनकारक असणार आहे.

वरील लिंकद्वारे नोंदणी केल्यानंतर उमेदवाराने प्रत्यक्ष भरती प्रक्रियेसाठी स्व-परिचय पत्र (बायोडाटा), पासपोर्ट साईज फोटो, आधार कार्ड, पॅनकार्ड यांच्या मूळप्रती व छायांकित प्रती आणणे अनिवार्य असेल. प्लेसमेंट ड्राईव्हच्या आयोजनासाठी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली प्लेसमेंट कक्षाचे अध्यक्ष प्रा. सत्यजित कांबळे व त्यांचा समुह विशेष परिश्रम घेत आहे.

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेत शिक्षण घेतलेल्या सर्व वाणिज्य विद्याशाखेच्या पदवी आणि पदव्युत्तर पदवीधर उमेदवारांना अधिकाधिक संख्येने प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

कौशल्याधारित शिक्षण प्रदान करून युवकांना महाविद्यालयाच्या माध्यमातूनच रोजगार प्रदान करणाऱ्या उपक्रमाच्या आयोजनाला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी प्लेसमेंट कक्षाला मनोभावे शुभेच्छा दिल्या आहेत.

## भाजपच्या माधव भंडारी यांची सदिच्छा भेट

**पनवेल : वार्ताहर**

भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते, राज्य भाजपा उपाध्यक्ष, राज्य महसूल पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष माधव भंडारी यांची मुंबई येथील निवासस्थानी लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानचे राज्याध्यक्ष, नामवंत उद्योजक, ज्येष्ठ समाजसेवक, दैनिक लोकशक्तीचे संपादक डॉ. संजय राजाराम सोनावणे व ॲड. एफ. एम. ठाकूर यांनी सदिच्छा भेट घेतली.



या वेळी सध्याचे राजकारण तसेच इतर विविध विषयांवरती त्यांची चर्चा झाली. पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यामध्ये विकासात्मक कामे करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन माधव भंडारी यांनी या वेळी त्यांना दिले.



## संपादकीय

# धक्क्यांवर धक्के

महाराष्ट्रात घडून आलेल्या सत्तांतराच्या नाट्यानंतर राजकारणाचा ज्वर काहिसा ओसरेल असे वाटले होते. परंतु दिवसेंदिवस तो वाढतोच आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आमदारांनी केलेल्या एकगठ्ठा उठावानंतर आता शिवसेना या पक्षाला जणु गळतीच लागली आहे.

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला साथीला घेऊन शिवसेनेने अडीच वर्षांपूर्वी सत्ता काबीज केली, तेव्हा सत्तेचा हव्यास हा प्रमुख मुद्दा होता व त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे होते, भारतीय जनता पक्षाला धडा शिकवण्याचे राजकारण. सत्तेच्या खेळामध्ये तेव्हा शिवसेना यशस्वी झाली, पण या प्रकारचे संधीसाधू राजकारण केव्हातरी अंगलट येणार याची अटकळ सर्वांना होती. महाविकास आघाडीतील अंतर्विरोध पहिल्या दोन-तीन महिन्यांतच भाजपच्या नेत्यांच्या ध्यानात आला होता. परंतु नव्या सरकारला कुठलाही राजकीय दगाफटका न करता विविध मार्गांनी जेरीस आणण्याचे प्रयत्न भाजपने सुरू ठेवले. या प्रयत्नांचेच फलित म्हणून महाविकास आघाडीचे दोन दिग्गज मंत्री गजाआड गेले. पोटनिवडणुकांमध्येही भाजपने महाविकास आघाडीच्या उमेदवारांना धूळ चारली. राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकांचा इतिहास इतका ताजा आहे की त्याला इतिहास म्हणणे देखील जड जावे. अखेर अडीच वर्षे कसाबसा तग धरून खुर्चीला चिकटून बसलेले ठाकरे सरकार जमीनदोस्त झाले. शिवसेनेला पडलेले भलेमोठे खिंडार सहजासहजी बुजणार नाही हे स्पष्टच आहे. किंबहुना, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली एकवटलेली शिवसेना खरी मानायची की तोळामासा प्रकृती झालेले ठाकरे समर्थकांचे कोंडाळे यालाच पक्ष मानायचे असा संभ्रम शिवसैनिकांमध्येच निर्माण झाला आहे. आमदारांपाठोपाठ शिवसेनेच्या बहुसंख्य खासदारांनीही वेगळी भूमिका स्वीकारण्याचे ठरवले असल्याचे बोलले जाते. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत उभ्या असलेल्या भाजपप्रणित उमेदवार श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना शिवसेनेच्या बहुतेक खासदारांचे पाठबळ मिळेल अशी चिन्हे आहेत. संसद आणि विधिमंडळ पातळीवर पक्षाची अशी दैना उडाली असतानाच ठाण्यातील ६६ माजी नगरसेवकांनी शिंदे गटात सामील होण्याचे ठरवले आहे. अन्य अनेक ठिकाणांहून शिवसेनेचे नगरसेवक, ग्रामपंचायतीचे सदस्य फुटत असल्याच्या बातम्या चहुबाजूंनी येत आहेत. नवी मुंबईतील तब्बल ३० हून अधिक माजी नगरसेवक शिंदे गटात सामील होत असल्याचे खात्रीलायक वृत्त असून आज-उद्याकडेच त्याचा फैसला होऊन जाईल. उठावात सामील झालेले आमदार आपापल्या मतदारसंघात परतले असून त्यांना देऊ केलेली ‘वाय’ दर्जाची सुरक्षा परतदेखील करण्याचा सपाटा त्यांनी लावला आहे. कारण या आमदारांना स्थानिक शिवसैनिकांच्या रोषाला बळी पडावे लागेल अशी जी अपेक्षा ठाकरे समर्थक नेत्यांना होती, तसे काहीच घडलेले नाही. उलटपक्षी उठावात सामील झालेल्या आमदारांचे कौतुकच सुरू झाले आहे. असे कौतुक होणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. कारण या आमदारांनी एवढे मोठे धाडस दाखवले नसते तर शिंदे-फडणवीस सरकारच्या रूपाने लोकांचे सरकार महाराष्ट्रात परत येऊच शकले नसते. ठाकरे समर्थक गटाला आता आपले अस्तित्व टिकवण्यासाठी मोठी आणि प्रदीर्घ लढाई करावी लागणार यात शंका नाही. निवडणुकीची निशाणी म्हणून आजवर गाजलेले धनुष्यबाण हे चिन्ह कायदेशीर लढाईत शिंदे गटाकडे गेले तर ठाकरे समर्थक गटाकडे गमावण्यासारखे काहीच उरणार नाही. ११ तारखेला सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीवरच ठाकरे समर्थकांच्या सगळ्या आशा टांगल्या गेल्या आहेत. तिथे काही बरे-वाईट घडले तर तो मात्र अंतिम धक्का असेल.

# रायगड जिल्ह्यातील खेळाडू नोकऱ्यांच्या प्रतीक्षेत

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

पूर्वी भाताचे कोठार म्हणून ओळखला जाणाऱ्या रायगड जिल्ह्यात मोठ्याप्रमाणावर औद्योगिकरण होत आहे. मोठमोठे प्रकल्प येत आहेत. त्याचबरोबर हा जिल्हा क्रीडाक्षेत्रामध्येही प्रगती करत आहे. अनेक खेळाडू राष्ट्रीय आंतरराष्ट्रीयस्तरावर पोहचले आहेत. यापैकी अनेकांना रोजगार नाहीत. त्यांना नोकरी नाही. नोकरी नसल्यामुळे बऱ्याच खेळाडूंची कारकिर्द संपली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये या जिल्ह्यातील खेळाडूंना नोकरी मिळवून देण्यासाठी क्रीडा संघटनांनी प्रयत्न करायला हवेत.

रायगड जिल्ह्यात अनेक मोठमोठे औद्योगिक प्रकल्प आहेत. या प्रकल्पांमध्ये जिल्ह्यातील खेळाडूंना फारकाही नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. सुरूवातीला काही खेळाडूंना जरूर नोकऱ्या मिळाल्या. त्यानंतर मात्र खेळाडूंची भरती झालीच नाही. रायगड जिल्ह्यात गुणवंत खेळाडूंची कमतरता नाही. परंतु त्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे खेळाडू नाराज होतात. नोकरी नसल्यामुळे खेळाडूंनी खेळ सोडून दिला आहे,अशी अनेक उदाहरणे या जिल्ह्यात आहेत.

कबड्डीमहर्षी बुवा साळवी आणि स्व. प्रभाकर पाटील यांची चांगली मैत्री होती. बुवा साळवी आणि प्रभाकर पाटील यांच्यामुळे रायगड जिल्ह्यात कबड्डी खेळ वाढला. त्याचा फायदा रायगडला झाला. आज शेकडो कबड्डीपटूंना नोकऱ्या मिळाल्या. काही खेळाडू मुंबईतील कंपन्यामध्ये, बँकामध्ये, हॉस्पिटलमध्ये कामाला लागले. काही खेळाडू पोलीस दलात लागले. खेळाडू कबड्डीमुळे पोटापाण्याला लागले.त्यामुळे खेळ वाढला. आता खेळाडूंना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे खेळाडू नाराज होतात. निराशेमुळे खेळाडू खेळ मध्येच सोडतात.

रायगड जिल्ह्यात खेळाडूंना प्रोत्साहन मिळते. परंतु खेळाडू आणि संघटनादेखील कमी पडतात. खेळाडू मेहनत घेत नाहीत. संघटना देणाऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत. मदत करणारे आहेत. परंतु त्यांच्यापर्यत पोहचले पाहिजे. ते होत नाही. सर्वच शासनाने केले पाहिजे, ही भावना नसावी. आपल्या भागात एखादा चांगला खेळाडू असेल तर समाजानेदेखील त्याला मदत केली पाहिजे.

नोकरी मिळाली नाही म्हणून अगदी बहरत असतानादेखील अनेक कबड्डीपटूंनी खेळ थांबवला आहे. त्यांची कारकिर्द संपली. जिल्ह्यात अनेक क्रिकेटपटू आहेत ज्यांना नोकरी नाही. या खेळाडूंना योग्य वयात जर नोकरी मिळाली नाही तर हे खेळाडू



देखील आपल्याला नोकरी मिळत नाही म्हणून नाराज होतील. दरम्यान, अशा स्थितीमुळे खेळाडू एकतर जिल्हा सोडून जातात किंवा खेळ थांबवतात.

रायगड जिल्ह्यात मोठमोठे औद्योगिक प्रकल्प आहेत. रिलायन्स, जेएसडब्ल्यू, आरसीएफ, ओएनजीसी, जेएनपीए असे अनेक प्रकल्प आहेत. या कंपन्यामध्ये पूर्वी काही खेळाडूंना नोकरी मिळाली नंतर मात्र खेळाडूंची भरतीच झाली नाही. यातील काही कंपन्या काही ठराविक स्पर्धा पुरस्कृत करतात. त्यात तेथील स्थानिक लोक खूश होतात. परंतु नोकरीच नसेल तर खेळाडू काय करणार आहेत. जिल्ह्यातील क्रीडाक्षेत्राची प्रगती करायची असेल तर खेळाडूंना आर्थिक पाठबळ मिळायलाच हवे. खेळाडूंना स्थैर्य मिळाले पाहिजे. यासाठी सध्या जे प्रकल्प आहेत, त्या प्रकल्पांमध्ये जिल्ह्यातील खेळाडूंना नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच भविष्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये जिल्ह्यातील खेळाडूंसाठी नोकरी देण्याची सक्ती केली पाहिजे. त्यासाठी केवळ राजकीय नेत्यांनीच प्रयत्न केले पाहिजेत असे नाही तर खेळाडूंच्या ज्या संघटना आहेत, त्यांनीदेखील यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

शासकीय सेवेमध्ये खेळाडूंसाठी पाच टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. परंतु त्या किती जणांना मिळाल्या आहेत. सध्या खेळाडूंना नोकरी मिळण्याचे एकमेव पर्याय आहे तो पोलीस दलाचा. येथे खेळाडूंसाठी चांगली संधी असते. तेथे किमान बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक असते. रायगड जिल्ह्यातील अनेक खेळाडू हे पोलीस दलात आहेत. परंतु काही वेळा शैक्षणिक पात्रतेचा प्रश्न येतो. राष्ट्रीय खेळाडू असूनही शिक्षण कमी असल्यामुळे हे खेळाडू अपात्र ठरतात अशी काही उदाहरणे या जिल्ह्यात आहेत.

या खेळाडूंना खासगी औद्योगिक प्रकल्पांमध्येच नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना चांगली नोकरी मिळाली तर ते खेळात प्रगती करू शकतील. तसेच हे खेळाडू आपला जिल्हा सोडणार नाहीत. त्यामुळे ते आपल्याच गावात राहून भावी पिढी घडवू शकतील. रायगडातून चांगले खेळाडू तयार होऊ शकतील. रायगडात गुणवंत खेळाडू आहेत. रायगडात अनेक चांगले खेळाडू आहेत. त्यांना नोकरी मिळाली पाहिजे, यासाठी वेळीच प्रयत्नांची गरज आहे.

# दामिनी ॲपव्दारे मिळणार पावसाळ्यातील संकटांची पूर्वसूचना

मान्सूनपूर्व आणि मान्सूनच्या सुरुवातीच्या कालखंडात विशेषतः माहे मे, जून व जुलै तसेच मान्सून पश्चात साधारणतः ऑक्टोबर या महिन्यात राज्यात अनेक ठिकाणी विजेच्या कडकडाटांसह पूर्वमौसमी पाऊस हजेरी लावतो. मान्सून दाखल झाल्यावर साधारणतः पहिल्या पावसात शहरी भागाबरोबरच विशेष करुन ग्रामीण भागात वीज कोसळून अनेक शेतकरी व नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. यासाठी शासनस्तरावर विविध सतर्क राहण्याच्या नागरिकांना सूचना तसेच विविध उपाययोजना करण्यात येत असतात.

वीज पडण्याच्या घटनेतील जीवितहानी कमी करण्यासाठी किंबहुना टाळण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुरु आहेतच. तथापि यावरचा एक उपाय म्हणजे पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली आणि पुण्यातील भारतीय उष्णप्रदेशीय हवामान संशोधन संस्था (आयआयटीएम) यांच्या संयुक्त प्रयत्नांनी वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाचा अचूक अंदाजाची पूर्वसूचना नागरिकांना मिळावी, याकरिता हे ॲप विकसित केले आहे. दामिनी ॲपसाठी आयआयटीएमने लाइटनिंग लोकेशन नेटवर्क हे मॉडेल विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून त्यांच्या परिसरातील वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाचा अचूक अंदाज पंधरा मिनिटे ते अर्धा तास आधी नागरिकांना घरबसल्या मिळणार आहे. त्यामुळे वादळी वाऱ्यांसह येणारा पाऊस आणि वीज पडल्यामुळे होणारी नागरिकांची जीवितहानी टाळणे शक्य होणार आहे. दरम्यान, विजांसह होणाऱ्या पावसाचे पूर्वानुमान शेतकऱ्यांना व नागरिकांना काही वेळ अगोदर समजावे, यासाठी दामिनी ॲप उपयोगी ठरणार आहे.

**-मनोज शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी,
रायगड-अलिबाग



## बदलते तंत्रज्ञान

### हॉटस्ॲपवर ब्लॉक झाल्यास

हॉटस्ॲपवर असताना तुम्हाला अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. अनेक वेळा कोणीतरी तुम्हाला नकळत ब्लॉक करते, पण तुम्हाला त्याची जाणीव नसते. हेदेखील शोधण्याचा एक सोपा मार्ग आहे. ब्लॉक शोधण्यासाठी तुम्ही काही सोप्या पायऱ्यांचे अनुसरण करू शकता.

ब्लॉक शोधण्यासाठी तुमच्याकडे अनेक पर्याय आहेत.



जर तुम्हाला संपर्काचा डीपी दिसत नसेल, तर याचा अर्थ त्यांनी तुम्हाला ब्लॉक केले आहे. मात्र, यामध्ये चूक होऊ शकते. अनेक वेळा तुम्ही कॉन्टॅक्ट डीपी काढून टाकता, मग तुम्हाला ब्लॉक केले गेले असेलच असे नाही. पण ब्लॉक केल्यानंतर तुम्हाला कॉन्टॅक्टची स्टेटस्ही दिसत नाही. जर तुम्हाला दोन्ही गोष्टी दिसत नसतील तर याचा अर्थ तुम्हाला ब्लॉक करण्यात आले आहे. यासोबतच तुम्ही युजरला मेसेज पाठवूनदेखील पाहू शकता की तुम्हाला ब्लॉक करण्यात केलेले आहे. जर तुमचा संदेश वितरित होत असेल तर याचा अर्थ असा आहे की तुम्हाला ब्लॉक केले गेले नाही. पण जर तुमचा मेसेज डिलिव्हर होत नसेल तर याचा अर्थ तुम्हाला ब्लॉक केले आहे. ब्लॉक झाल्यास, तुमचा संदेशदेखील वितरित केला जाणार नाही. पण अशी परिस्थिती प्रत्येक वेळी असेलच असे नाही.

जर तुम्हाला एखाद्याला अनब्लॉक करायचे असेल तर त्यासाठी तुम्हाला संपूर्ण प्रक्रिया फॉलो करावी लागेल. याचे कारण दुसऱ्याच्या खात्यावर जाऊन तुम्ही स्वतःला अनब्लॉक करू शकत नाही. यासाठी तुम्हाला फक्त समोरच्या युजरला विनंती करावी लागेल. जर त्याला हवे असेल तरच तुम्हाला अनब्लॉक करता येईल. अनब्लॉक करण्यासाठी, ते त्यांच्या ब्लॉक लिस्टमध्ये जाऊन तुमचे नाव काढून टाकू शकतात. दरम्यान, व्हॉट्सॲप ही एक लोकप्रिय संदेशन प्रणाली आहे. हिच्यामार्फत लोक इंटरनेट वापरून एकमेकांशी चर्चा करतात, संदेश पाठवतात व वाचतात. संदेशासोबत चित्रे, गाणी, व्हीडियो व इतर प्रकारच्या फाईल्सदेखील एकमेकांसोबत सामाईक करता येतात. मात्र हे ॲप वापरत असताना या विषयी आपल्याला बरीच माहिती अवगत असणे गरजेचे असते. एखाद्या ॲपविषयी माहिती नसेल तर बराच तोटा होऊ शकतो. वरिल सांगितल्याप्रमाणे कोणीतरी तुम्हाला नकळत ब्लॉक करते, पण तुम्हाला त्याची जाणीव नसते. यामुळे तुमचे प्रसंगी नुकसान होऊ शकते. यामुळे सर्व माहिती अवगत असणे गरजेचे असते.

# दूरदृष्टी, सृजनशील साहित्यिक गोपाल दांडेकर



गोपाल नीलकंठ तथा गो. नी. दांडेकर यांचा जन्म ८ जुलै १९१६ रोजी परतवाडा (विदर्भ) येथे झाला. दांडेकर हे एक अनुभवसंपन्न, सृजनशील, रसिक वृत्तीचे कलावंत आणि लेखकही होते. तसेच ते कुशल छायाचित्रकार आणि दुर्गप्रेमीसुद्धा होते. त्यांचे वडील शिक्षक होते. वयाच्या १२ व्या वर्षी दांडेकर यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी पलायन केले. त्यासाठी त्यांनी सातव्या इयत्तेमध्ये शाळा सोडली. त्यानंतर दांडेकर हे संत गाडगे महाराजांच्या सहवासात आले. इतकेच नाहीत तर त्यानंतर ते गाडगेमहाराजांचा संदेश पोचवण्यासाठी गावोगाव हिंडले. नंतर दांडेकर यांनी वेदान्ताचा अभ्यास करणे सुरू केले. पुढे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते बनले. १९४७ मध्ये दांडेकर यांनी लेखनकार्यावर जीवितार्थ चालविण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी पुढील आयुष्यात कुमारसाहित्य, ललित गद्य, चरित्र, कादंबरी, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, धार्मिक, पौराणिक इत्यादी विविध प्रकारचे लेखन केले.

दांडेकर त्यांच्या पडघवली आणि शितू या कादंबऱ्या कोकणाचे नयनरम्य चित्र डोळ्यासमोर उभे करतात. त्यांचे दुर्गभ्रमणगाथा हे महाराष्ट्रातील किल्ल्यांवरील प्रवासवर्णन प्रसिद्ध आहे. १ जून १९९८ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले. त्यांची मुलगी डॉ. वीणा देव या प्रसिद्ध लेखिका आहेत. त्यांची नात मधुरा देव हीसुद्धा ललित लेखन करते आणि दुसरी नात मृणाल देव-कुलकर्णी ही विख्यात अभिनेत्री आहे. गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यांच्या वाचनाचा सार्वजनिक कार्यक्रम वर्षातून अनेकदा होतो. या उपक्रमाची सुरुवात १९७५मध्ये प्रत्यक्ष दांडेकर यांनी केली.

संत ज्ञानेश्वरांच्या सातव्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांनी सर्वप्रथम ’मोगरा फुलला’ या कादंबरीचे अभिवाचन केले होते. यामध्ये त्यांची कन्या डॉ. वीणा देव, जावई डॉ. विजय देव हे सहभागी झाले होते. कादंबरीतील कथानाट्य वाचनातून लोकांपुढे उभे करण्याच्या या अभिनव प्रयोगाचे त्या वेळी सर्वत्र स्वागत झाले होते. यानंतर दांडेकर यांच्या कुटुंबीयांनी या अभिवाचनाची एक चळवळच उभी केली. ’मोगरा फुलला’च्या पाठोपाठ मग शितू, पडघवली, मृण्मयी, पवनाकाठचा धोंडी, वाघरू, जैत रे जैत, देवकीनंदन गोपाळा अशा एकेक कलाकृती या अभिवाचन संस्कृतीतून वाचकांना भेटू लागल्या. दांडकर हयात असताना सुरू झालेला हा उपक्रम त्यांच्या पश्चातही या कुटुंबाने अखंडपणे सुरू ठेवला. त्यांच्या या उपक्रमात पुढे देव कुटुंबीयांचे जावई रुचिर कुलकर्णी हेदेखील सहभागी झाले. गो. नी.दांडेकर यांनी पन्नास वर्षे दुर्गभ्रमण केले. या काळात त्यांनी गडाकोटांची, त्यांवरील वास्तूंची असंख्य छायाचित्रे काढली. त्यांपैकी निवडक अशा ११५ कृष्णधवल छायाचित्रांचे एक पुस्तक ’गोनीदांची दुर्गचित्रे’ या नावाने प्रकाशित झाले आहे. हे दुर्गप्रेम त्यांनी परोपरीने जागवले. त्यांनी स्वतः जन्मभर दुर्गभ्रमंती केलीच पण ’दुर्गदर्शन’, ’दुर्गभ्रमणगाथा’ या आपल्या पुस्तकांमधून त्यांनी दुर्गभ्रमंतीचे अनुभव शब्दबद्ध केले. मराठीतील ललित साहित्यात त्यांचे हे लेखन अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या लेखनामुळे हजारो माणसे दुर्गभ्रमंतीकडे आकर्षित झाली. त्यातल्या अनेकांना गोनीदांनी स्वतः प्रत्यक्ष दुर्गदर्शनही घडवले. ’किल्ले’ हे त्यांचे छोटेखानी पुस्तक दुर्गप्रेमींच्या मनात मानाचे स्थान मिळवून आहे. ’पवनाकाठचा धोंडी’, ’जैत रे जैत’, ’रानभुली’, ’त्या तिथे रुखातळी’, ’वाघरू’, आणि ’माचीवरला बुधा’ या त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये त्यांनी प्रत्ययकारी दुर्गदर्शन घडवले आहे.




**पनवेल :** पावसाचा जोर अधूनमधून सुरुच आहे. इतरवेळी वेगाने जाणारी वाहने पावसामुळे मात्र आता धिम्म्यागतीने जात असताना दिसत आहेत. महामार्गावरील हे चित्र कॅमेऱ्यात टिपले आहे, छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांनी.



## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात आजारांकडे लक्ष द्या

पावसाळ्यात आजारी पडायचे नसेल तर लक्षात ठेवा या पाच बाबी. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार हमखास होणाऱ्या चुका पावसाळ्याआधी किंवा पावसाळ्यात तेलाची बस्ती करुन घेतले तर वाताचे विकार आटोक्यात राहण्यास मदत होते. पाण्यात सुंठ घालून ते उकळल्यास या काळात कमी झालेली भूक वाढेण्यास मदत होते.



पावसाळा म्हणजे सगळीकडे हिरवेगार, वाहणारे धबधबे आणि शेतीसाठी आबादीआबाद असा हा ऋतू, मात्र आरोग्यासाठी मात्र पावसाळा म्हणावा तितका चांगला नाही. सततच्या दमट हवामानामुळे हवेत वाढणारे जंतूंचे प्रमाण, पाणी दूषित होत असल्याने उद्भणाऱ्या पचनाच्या समस्या हे नेहमीचेच ठरले आहे. मात्र आपल्याला पावसाळा एन्जॉय करता यावा आणि आजारपण आपल्यापासून दूर राहावे यासाठी आहाराची जास्त काळजी घेणे आवश्यक असते. थंड हवेमुळे या काळात भूक तर लागते. पण पचनशक्ती क्षीण झाल्याने अन्न म्हणावे तसे पचत नाही. त्यामुळे गॅसेस, बद्धकोष्ठता, ॲसिडीटी असे त्रास उद्भवू शकतात. तसेच या काळात गारठ्यामुळे सर्दी-ताप, खोकला यांसारखे संसर्गजन्य आजारही वाढतात. या आजारांपासून दूर राहण्यासाठी कोणत्या गोष्टींची विशेष काळजी घ्यायला हवी याविषयी आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. संदिप काळे यांनी सांगितले आहे. त्यानुसार पचायला हलका, गरम आहार घ्यावा- या काळात वातावरणात आम्लता वाढल्यामुळे, पचनशक्ती कमी झाल्याने अपचनाच्या तक्रारी वाढू लागतात. त्यामुळे अनेकदा गॅसेस होण्याचे प्रमाण वाढते. म्हणून पावसाळ्यात शक्यतो कमी प्रमाणात घ्यावा. तसेच पचायला जड असलेले पदार्थ खाऊ नयेत. तसेच शिळे, आंबवलेले पदार्थ टाळायला हवेत. जास्तीत जास्त ताजा आणि गरम आहार घ्यावा.

काय खावे, काय खाऊ नये?- पावसाळ्यात शक्यतो वातूळ पदार्थ म्हणजेच वाटाणे, हरभरा, छोले असे वातूळ पदार्थ टाळलेले चांगले. खाल्ले तरी त्याचे गरम सूप करुन, फोडणी देऊन खायला हवे. या काळात पालेभाज्या शक्यतो कमी प्रमाणात खाव्यात. आहारात सुंठ किंवा आल्याचा आवर्जून वापर करावा म्हणजे इन्फेक्शनपासून दूर राहणे शक्य होते, तसेच सैंधव मीठ आणि गाईच्या तूपाचा समावेश करावा. पावसाळ्यात शक्यतो बाहेरचे खाणे टाळावे. या काळात माश्यांचे प्रमाण वाढलेले असते. अनेकदा माशांमुळे संसर्ग पसरायला मदत होते. बाहेरचे अन्न किती शिळे आहे, ते बनवताना कोणते पदार्थ, पाणी वापरले आहेत हे आपल्याला माहित नसते. या मुळे काळजी घेतली पाहिजे.

# चांदेपट्टी दरडग्रस्तांना भाजपतर्फे ब्लँकेट वाटप

## नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी यांचे सहकार्य

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील चांदेपट्टी येथील ग्रामस्थांना आंबेघर येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. या आपद्ग्रस्तांना पेण तालुका आणि नागोठणे शहर भाजपतर्फे ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

पेण तालुक्यातील दुर्गम भागात वसलेल्या चांदेपट्टी गावाला दरड व भूस्खलनाची भीती असल्याने तेथील २६ कुटुंबांतील ५६ ग्रामस्थांना पेण तालुका मराठा समाज सभागृहात स्थलांतरित करण्यात आले आहे. या स्थलांतरित करण्यात आलेल्या चांदेपट्टीवासीयांना भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या पुढाकाराने पेण तालुका आणि नागोठणे शहर भाजपतर्फे ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजप रायगड जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, भाजपचे नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, उपाध्यक्ष गौतम जैन, रोहा तालुका महिला मोर्चा उपाध्यक्ष नीलिमा राजे, नागोठणे विभाग महिला मोर्चा सरचिटणीस मुग्धा गडकरी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




(छाया : अनिस मनियार)

पेण प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार आणि तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनीदेखील गुरुवारी (दि. ७) मराठा समाज सभागृहात जाऊन चांदेपट्टी ग्रामस्थांची भेट घेतली व त्यांना पुरविण्यात आलेल्या सुविधांचा आढावा घेतला.

**चांदेपट्टी गावाला भूस्खलनाची कायमस्वरूपी भीती आहे. या गावाच्या पुनर्वसनासाठी अनेक ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध आहेत. या गावाच्या पुनर्वसनासाठी शासन दरबारी प्रयत्न करण्यात येईल.**
**–वैकुंठ पाटील, उपाध्यक्ष, रायगड जिल्हा, भाजप**

## अलिबाग विभागात
# आठ पूल कमकूवत



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग विभागातील आठ पूल कमकूवत आहेत. यापैकी दोन पुलांचे मजबूतीकरण करण्यात येणार आहे. सहा ठिकाणी नवीन पूल बांधण्यात येणार आहेत. तालुक्यातील खडताळ पूलाला पर्यायी नवीन पूल बांधण्यात येणार आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.


अलिबाग विभागात ४४ लहान आणि २५ मोठे असे एकूण ६९ पूल आहेत. त्यापैकी १३ पूलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. त्यात आठ पूल कमकुवत असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे.

रेवदंडा, एकदरा, खडताळ, सहाण, पाले, नवेदरबेली, आवास आणि सासवणे हे पूल कमकूवत झाले आहेत. त्यापैकी रेवदंडा व एकदार या पुलांचे मजबूतीकरण करण्यात येणार आहे. अलिबाग–रेवस मार्गावरील खडताळ पूलाला पर्याय म्हणून नवीन पूल बांधण्यात येणार आहे. आवास, सासवणे, सहाण, पाले, नवेदरबेली येथेदेखील नवीन पूल बांधण्यात येणार आहे, अशी माहिती जगदीश सुखदेवे यांनी दिली. काही पूल कमकूवत झाले आहेत, त्यावरून अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे सुखदेवे यांनी सांगितले.

# रायगडात वनविभाग करणार पाच लाख २५ हजार वृक्षांची लागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यात ७ ते १५ जुलै या कालावधीत वनमहोत्सव साजरा केला जाणार आहे. या अंतर्गत रायगड जिल्ह्यात वनविभागामार्फत पाच लाख २५ हजार वृक्षांची लागवड करण्याचे उद्दीष्ट समोर ठेवण्यात आले आहे.



जागतिक तापमानात होत असलेली वाढ, वातावरणात होणारे बदल, निसर्गाचे बललेले रुतूचक्र, अनियमित पर्जन्यमान आणि दुष्काळ यामुळे वातावरणाचा समतोल ढासळत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ७ ते १५ जुलै या कालावधीत राज्यभरात वृक्षलागवड कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यात रायगड जिल्ह्यात पाच लाख २५ हजार वृक्षांचा समावेश असणार आहे.

जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, वनविभाग आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्यासह सर्व शासकीय, निमशासकीय अस्थापना, ग्रामपंचायती या वृक्षलागवड उपक्रमात सहभागी होणार आहेत. तिनविरा येथील वनविभागाच्या नर्सरीत यासाठी रोपे तयार करण्यात आली आहेत. यात काजू, आंबा, कांचन, आवळा, फणस, खैर, बहावा, वड, जांभूळ, पुनई, चाफा, गुलमोहर आदी वृक्षरोपांचा समावेश आहे, अशी माहिती अलिबाग वनपरिक्षेत्र अधिकारी आर. एच. पाटील यांनी दिली. या वृक्षलागवड कार्यक्रमात स्थानिकांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा, असे आवाहन वनविभागाने केले केले आहे.

**वनमहोत्सवात यावर्षी रायगड जिल्ह्यात पाच लाख २५ हजार वृक्षांची लागवड करण्याचे उद्दीष्ट वनविभागाने ठेवले आहे. त्यासाठी आवश्यक तयारी पूर्ण झाली आहे. खड्डे ख़णून त्यांचे जिओ टॅगिंग करण्यात आले आहे. सामाजिक संस्थांनीही या उपक्रमात मोठा सहभाग देण्याची तयारी दाखवली आहे. नागरिकांनीही वृक्षलागवड आणि संवर्धनासाठी पुढे येण्याची गरज आहे.**
**–आशिष ठाकरे, उपवनसंरक्षक, वन विभाग–अलिबाग**

## पोलादपुरात अपंगांकडून वृक्षारोपण; आमदारांकडून कौतुक



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

प्रहार संघटनेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांचा वाढदिवस पोलादपूर तालुक्यातील अपंग बांधवांच्या संघटनेकडून वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. आमदार प्रवीण दरेकर आणि आमदार भरत गोगावले यांनी या अपंगांचे कौतुक केले.

आमदार बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील अपंग बांधवांनी पोलादपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, नगरपंचायत कार्यालय, पोलीस ठाणे, तहसील कार्यालय या परिसरात मंगळवारी वृक्षारोपण केले. छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून वृक्षारोपणाच्या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. संघटनेचे तालुका उपाध्यक्ष महमद मुजावर, तालुका महिला अध्यक्षा अलिया धामणकर, उपाध्यक्षा सुनीता माने, शहर अध्यक्षा शमशाद हकिम, सहसचिव पोपट चव्हाण, शहर सचिव प्रशांत पवार, सदस्या संगिता राजन नायर, अस्मिता जगताप आदींनी या उपक्रमाचे आयोजन केले होते.

या वेळी चोळई येथील दरडग्रस्त गावाला भेट देणारे भाजपनेते आमदार प्रवीण दरेकर आणि महाडचे आमदार भरत गोगावले यांनी अपंग कार्यकर्ते व प्रहार संघटनेच्या सदस्यांचे कौतुक केले.

# रायगड एलसीबी अधिकाऱ्यांना मालमत्ता हस्तगत पुरस्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक यांच्याकडून दिला जाणारा सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत पुरस्कार रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखे (एलसीबी)तील अधिकारी व अमलदारांना देऊन गौरविण्यात आले.



ऑगस्ट ते डिसेंबर २०२१ या कालावधीत गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत या करीता महाराष्ट्र राज्य अपर पोलीस महासंचालकांनी एकूण ११ गुन्ह्यांची पोलीस महासंचालकांकडे शिफारस केली होती. त्यानुसार महासंचाकांनी कोकण परिक्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील मांडवा सागरी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याकरिता (गुन्हा रजि.नं.०९/२०२१) सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत हा पुरस्कार रायगड पोलीस दलातील एलसीबीचे निरीक्षक दयानंद गावडे, सहाय्यक निरीक्षक धनंजय पोरे, हवालदार अमोल हंबीर, प्रशांत दबडे यांना जाहीर केला.

विशेष पोलीस महानिरीक्षक संजय मोहिते यांच्या हस्ते दयानंद गावडे, धनंजय पोरे, अमोल हंबीर, प्रशांत दबडे यांना सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत हा पुरस्कार देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

# पेण–दिवा रेल्वे मार्गावर दोन नव्या मेमू गाड्या

**पेण : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने पेण–दिवा मार्गावर मंगळवारी (दि. ५) पासून दोन नव्या मेमू गाड्या सुरू केल्या असून, त्याबद्दल पेणमधील प्रवाशांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला.



पेणकरांना जास्तीत जास्त एक्स्प्रेस गाड्या आणि मेमू गाड्या मिळाव्यात, अशी मागणी मी पेणकर आम्ही पेणकर या संघटनेने केली होती. मध्य रेल्वे प्रशासनाने या मार्गावर रोज सकाळी पावणेसात वाजता आणि सायंकाळी सहा वाजता अशा दोन नव्या पेण–दिवा मेमू गाड्या सुरू केल्या आहेत. त्याबद्दल पेणमधील प्रवाशांनी मंगळवारी रेल्वे स्थानकात पेढे वाटून आनंद व्यक्त केला. तसेच स्टेशन मास्तर एल. एन ठाकूर व चालक यांचे स्वागत केले. या वेळी मोहिनी गोरे, योगेश म्हात्रे, सी. आर. म्हात्रे, विजय पाटील, काशिनाथ पाटील आदींसह मी पेणकर आम्ही पेणकर शाश्वत कमिटीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी मेमू गाडीमधून जाणाऱ्या प्रवाशांना गुलाब पुष्प व पेढे देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo: 7000023778**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-35/2022-2023**<br>Extension to RFx e-tender for work of AMC for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M DIV Panvel.<br>**Tender amount Limited to Rs. 15,00,000/-,**<br>**EMD amount Rs. 15,000/-.** |
| 2 | Online Downloading the RFx | **07.07.2022, 18:00 Hrs. to 14.07.2022, 23:59Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 14.07.20222 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **15.07.2022 at 11:05 hrs.(if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN.PANVEL**


## नावंढे येथील शिबिरात ७९ दाखल्यांचे वाटप

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील नावंढे येथे खालापूर तहसील कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात एकूण ७९ विविध शासकिय दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली नावंढे येथे दाखले वाटप शिबिर घेण्यात आले. या शिबिरात १६ अधिवास दाखले, ४८ उत्पन्नाचे दाखले, १५ जात प्रमाणपत्रे यांचे वाटप करण्यत आले.

नायब तहसीलदार दशरथ भोईर, पंचायत समिती सदस्य अक्षय पिंगळे, नावंढे सरपंच उषा हनुमंत पिंगळे, अव्वल कारकून सचिन अं. वाघ, मंडळ अधिकारी चंद्रशेखर खोत, तलाठी रणजीत कवडे, प्रतिक बापर्डेकर, सुवर्णा कोल्हे, नावंढे ग्रामसेवक महेश म्हसे, कर्मचारी शेखर हाडप यांच्यासह विद्यार्थी व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# कृषी संजीवनी मेळाव्यातून महाड तालुक्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील विन्हेरे परिसरात कृषी विभागाच्या कृषी संजीवनी मेळाव्याच्या माध्यमतून शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन केले जात आहे. नुकतेच राजिवली गावात कृषी तंत्रज्ञान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाड तालुक्यात आतापर्यंत १३४ ग्रामपंचायतीमध्ये कृषी संजीवनी मेळावे आयोजित केले गेले आहेत. कृषी संजीवनी मेळाव्यांतून महाड तालुक्यातील शेतकऱ्यांना भात बियाणे, बियाणे निवड, आणि लागवड, यांत्रिक सांधणे आदीबाबत मार्गदर्शन केले जात आहे. या मेळाव्यांना उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

राजिवली येथे भातपिक शेतीशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमात कृषी पर्यवेक्षक टी. पी. जगदाळे यांनी रोपवाटिका व्यवस्थापन, शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्या, खत व्यवस्थापन, भात लागवडीच्या विविध पद्धती, नाचणी लागवड तंत्रज्ञान व नाचणी प्रक्रिया उद्योग, भाजीपाला उत्पादन वाढ, कृषी यांत्रिकीकरण, फळबाग लागवडीसंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले.

कृषी सहाय्यक यु. एस. लेंगरे यांनी, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, १० टक्के खत बचत मोहीम या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. राजिवली सरपंच विकास जगदाळे यांच्यासह शेतकरी या भातपिक शेतीशाळेस बहुसंख्येने सहभागी झाले होते.




(छाया : महेश शिंदे)


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ३० सन २०२२-२३ (द्वितीय सूचना)**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी–१** नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | आंबेत बागमांडला रस्ता रा.मा.–१०० कि.मी. १८/८०० मध्ये पांगळोली पुलाचे पुर्नबांधकाम करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पुल, ०३ राज्य मार्ग) **(द्वितीय सूचना)** | १३३३७५६३ | १३४००० | ११२०/– | ०६ महिने | वर्ग चार व वरील |
| २. | बिरवाडी वाळण सांदोशी रस्ता रा.मा.–१०२ कि.मी. १९/३०० येथे पुलाचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (पूरहानी दुरुस्ती) **(तृतीय सूचना)** | २४७०५२४२ | १५०००० | २२४०/– | ०५ महिने | इतर |
| ३. | पोलादपूर वाई सुरूर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. १/०० ते २/२०० मध्ये गॅबियन वॉल बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (पूरहानी दुरुस्ती)**(द्वितीय सूचना)** | १०२५५७७४ | १०३००० | ११२०/– | ०६ महिने | वर्ग चार व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक (द्वितीय / तृतीय सूचना)**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०७/०७/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१८/०७/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | **निविदापूर्व बैठक** फक्त अ.क्र. २ चे कामासाठी | अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१२/०७/२०२२** वेळ **१२.००** वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२१/०७/२०२२** वेळ १२.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३०३९**
**दिनांक : ०४/०७/२०२२**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

## निवडक

### मोबाइल हिसकावून चोरटे पसार

**पनवेल :** दुचाकीवरून आलेल्या अनोळखी चोरट्यांनी ३० वर्षे तरुणाच्या हातातील मोबाइल खेचून ते पसार झाले आहेत. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडघर-करंजाडे येथे राहणारे राजेश कुमावत हे सोमवारी (दि. ४) तबेल्यात दूध आणण्यासाठी निघाले. सेक्टर नंबर दोन ए येथील जिल्हा परिषद शाळा चिंचपाडा समोर आले असता त्यांच्या डाव्या हातात मोबाइल होता. या वेळी पाठीमागून एका दुचाकीवरून दोन जण आले व एकाने राजेश यांच्या हातातील मोबाइल हिसकावला व पळून गेले.

### नवी मुंबईत बालकांना झिंक गोळ्यांचे वाटप

**नवी मुंबई :** महापालिका कार्यक्षेत्रात अतिसार नियंत्रण पंधरवडा मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेमध्ये पाच वर्षांपर्यंतच्या वयोगटातील लाभार्थींना ओआरएस पाकिटांचे व झिंक गोळ्यांचे वितरण करण्यात येत आहे. नवी मुंबई पालिका कार्यक्षेत्रातील बालकांचे आशा, स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व आरोग्य कर्मचारी हे प्रत्येक घरोघरी भेट देऊन सर्वेक्षण करणार आहेत. अतिसार नियंत्रण पंधरवडा या मोहिमेचे व्यवस्थापन व अंमलबजावणी करण्यासाठी ११ जून रोजी पालिका स्तरावर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, ए.एन.एम.एल यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

### संजय जैन यांचा गौरव

**पनवेल :** सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे विविध



संस्था, रोटरी क्लब आणि गणेश उत्सव मंडळाच्या माध्यमातून पनवेल परिसरात कार्य करणारे संजय जैन यांच्या कार्याची दखल घेऊन रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन यांच्या वतीने त्यांना विशेष सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनचे प्रेसिडेंट गुरुदेव सिंग कोहली व इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जैन यांना सन्मानित करण्यात आले.

### पनवेलमध्ये उद्या कन्यादान सोहळा

**पनवेल :** येथील श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान यांच्या वतीने ८३ वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा शनिवारी (दि. ९) आयोजित करण्यात आला आहे. सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने ८३वा शास्त्रयुक्त कन्यादान सोहळा श्री साई बाबा मंदिर स्टेशन रोड पनवेल येथे आयोजित करण्यात आला असून, अंत्यत शास्त्रयुक्त पद्धतीने हा सोहळा होणार असून या ठिकाणी या कन्यादान सोहळ्यानिमित्त येणारा सर्व खर्च श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थान यांच्या वतीने करण्यात येणार आहे. तरी वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पावसाळी पर्यटनावर पोलिसांचा वॉच

## पनवेल परिसरात अधिकारी, अंमलदारांचा बंदोबस्त

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्याच्या दिवसात पर्यटकांची मोठी रांग पनवेल तालुक्यातील परिसरातील गाढेश्वर धरण, माची प्रबळ, मोरबे धरण कुंडी धबधबा, शांतीवन नदीपात्र, गाढी नदीकडे लागते. त्यामुळे यावर्षी १० पोलीस अधिकारी आणि १९ अंमलदारांचा बंदोबस्त राहणर असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी दिली आहे.

गाढेश्वर धरण, गाढेश्वर मंदिरच्या बाजूला, वाजे फाटा, कुंडी धबधबा टी पॉईंट, माची प्रबळ पायथा, वारदोली धबधबा, पोयंजे नानई बेकरीजवळ, मोरबे धरण आदि ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

माथेरान परिसरात पाऊस जास्त पडतो व गाढी नदीला अचानक पूर येतो. त्यामुळे अनेकदा पर्यटकांचा या पाण्यात बुडून मृत्यू झालेला आहे.



गाढी नदी ही खडकाळ आहे. त्यामुळे यावर डोके आपटून व जखमी होऊन पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पावसाचे दिवस असल्याने तालुक्यातील गाढेश्वर धरण परिसर पर्यटकांना खुणावत आहे. दरवर्षी पावसाळ्यात धरण परिसरात एका-दुसऱ्याचा मृत्यू होतो. पोलीस सर्वांना सावधानतेचा इशारा देतात. मात्र याकडे पर्यटक कानाडोळा करतात. त्यामुळे पोलिसांनी या ही वर्षी धरण परिसरात जाण्यास बंदी

> धबधबे, धरण परिसरात पोलीस तैनात करण्यात आले असून धबधब्याजवळ पर्यटक पोहोचू शकतील अशा सर्व मार्गांवर पोलीस लक्ष ठेवून आहे. जर कोणी पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
> -शिवराज पाटील, पोलीस उपायुक्त, परिमंडळ- २, नवी मुंबई

> पर्यटकांनी पावसाळी पर्यटन ठिकाणी येऊ नये, परिसरातील बंगले मालक,फार्म हाऊस मालक यांच्याकडे येणारे पाहूणे नदीच्या पात्रात गेले नाही पाहिजेत. त्यांची जबाबदारी मालकाची राहील. त्यांना नदीच्या पात्रात जाण्यास मज्जाव केला पाहिजे. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडला तर बंगले आणि फार्म हाऊस मालक जबाबदार असतील.
> -रवींद्र दौंडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल तालुका

घातलेली आहे.

पावसाळा नुकताच सुरू झाल्याने धरणाच्या परिसरात पाणी शिल्लक नाही त्यामुळे पर्यटकांची सध्या वर्दळ कमी आहे. निसर्गाचे सान्निध्य, हिरवाई, चारही बाजूंनी डोंगराच्या रांगा, त्यामध्ये धरणातून धबधब्यासारखे पडणारे पाणी यामुळे हजारो पर्यटक धरण परिसरात आकर्षक होतात. याच ठिकाणी मद्यपान करतात. त्यामुळे या पाहण्याचा मोह आवरत नसल्याने पर्यटक पाण्यात उतरतात. पाण्याचा अंदाज न आल्यामुळे एखाद दुसऱ्याला आपला जीव येथे गमवावा लागतो. जनतेच्या जीवाची आणि सुरक्षिततेसाठी जबाबदारी लक्षात घेऊन पोलीस बंदोबस्त नेमण्यात येणार आहे मात्र तरीदेखील अनेक पर्यटक चोरवाटा शोधून धरणाच्या आणि धबधबा परिसरात जातात.

## शेतकऱ्यांसाठी भातशेती मत्स्यपालन प्रशिक्षण

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व खारजमीन संशोधन केंद्र पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने भातशेतीमध्ये मत्स्य पालनाचे प्रशिक्षण नुकतेच पार पडले. मत्स्यशास्त्रज्ञ डॉ. विवेक वर्तक यांनी या वेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.



भातशेतीतील मत्स्य संवर्धनाचे फायदे, माशांचे आहारातील महत्त्व, मत्स्य व्यवसायापासून रोजगार निर्मितीची संधी, मत्स्यसंवर्धनासाठी विविध मत्स्यजाती, नापिक, पडीक जमिनीतील मत्स्यशेती, मत्स्य प्रजनन, माशांचे पौष्टिक खाद्य, माश्यापासून तयार होणारे प्रक्रिया पदार्थ, मत्स्य जाती ओळख, मत्स्य साठवणूक याबाबत मार्गदर्शन केले, तसेच प्रक्षेत्र भेटीद्वारे भातशेतीत पाणी साठविण्यासाठी बांधबंदिस्ती आणि चर, मत्स्य काढणी याबाबत डॉ. वर्तक यांनी मार्गदर्शन केले. कृषी विद्यावेत्ता डॉ. मनोज वहाने यांनी मत्स्य संवर्धनासाठी पाण्याचे भौतिक घटक व त्यांचे आवश्यक प्रमाण, पाण्याचे रासायनिक व त्याचे आवश्यक प्रमाण, सामू, सामू संतुलन, प्रकाश, पाण्याचा दाब, पाण्याची पारदर्शकता, पाण्याची घनता याबाबत मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणाच्या वेळी ५० ते ६० मत्स्यपालन शेतकऱ्यांनी लाभ घेतला. या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यादेखील उपस्थित होत्या.

## मोहोपाडा येथे आज हृदयविकार चाचणी शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील श्रीपाद हॉस्पिटल आणि पनवेल येथील शुश्रुषा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ८) मोफत हृदय विकार चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात रक्तशर्करा, रक्तदाब ईसीजी तसेच तज्ञ डॉक्टरांचा सल्ला नागरिकांना मोफत मिळणार आहे. शिवाय ५० वर्षांपुढील नागरिकांसाठी अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी पिवळे व केशरी रेशनकार्ड धारकांसाठी मोफत असणार आहे. हृदय विकार शिबिर श्रीपाद हॉस्पिटल मोहोपाडा, बँक ऑफ इंडिया जवळ शुक्रवारी आयोजित करण्यात आले आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. लक्ष्मण वाघमारे (एमडी), डॉ. मुकेश जनदयाल, डॉ हनुमंत खामकर, डॉ. संजय म्हात्रे तसेच शुश्रुषा सुपर



स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. संजय आर. तारलेकर (एमडी,डिएम) प्रयत्नशील आहेत. तरी नागरिकांनी आपली नावनोंदणी जनसंपर्क अधिकारी कुमार लोंढे (७३०८३९३६७८/७०३०२७९१८८/७७१८०९६७४०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.





## पनवेल महापालिकेच्या शाळेत वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेल महापालिकेच्या शाळा क्रमांक २० पीर करम अली शाह शाळेत वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या वेळी नगरसेवक मुकिद काझी, भाजप अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष जवाद मुकीत काझी, मुख्याध्यापिका नफीसा डाखवे, गफ्फार पठाण व शाळेचे वर्ग शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान नगरसेवक मुकिद काझी म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब ही पनवेलच्या गरजू लोकांना देवाची देणगी आहे. ईश्वर त्यांना उदंड, निरोगी आणि भरभराटीचे आयुष्य देवो.

## फुंडे विद्यालयात वाजेकर यांची जयंती

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे फुंडे येथील वीर तुकाराम हरी वाजेकर विद्यालयात तालुक्यांतील शिक्षण महर्षी वीर तु. ह. वाजेकर यांची ११५ वी जयंती बुधवारी (दि. ६) उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने मिठागर युनियन कार्यालयातील त्यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले.

वीर तु. ह. वाजेकर सामाजिक संस्थेच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील व वीर तु. ह. वाजेकर या दोन शिक्षण महर्षींच्या प्रतिमेस स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णा कडू, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनिता वर्तक, स्कूल कमिटीचे सदस्य रमाकांत म्हात्रे, वाजेकरांचे नातू ज्येष्ठ पत्रकार प्रदीप पाटील, मंगेश वाजेकर, विराज वाजेकर, दिलीप कडू पर्यवेक्षक जी. सी. गोडगे, कार्यालयीन अधिक्षक एम. पी. तुमडे, ज्युनिअर कॉलेजचे प्रमुख व्ही. के. कुटेया यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. या वेळी सांकृतिक विभाग प्रमुख दर्शना माळी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर



### महाविद्यालयातही अभिवादन

**उरण : रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात उरणचे राजे तु. ह. वाजेकर यांची जयंती बुधवारी साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी प्रतिमा पूजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुजाता पाटील यांनी केले. तर प्रा. राम गोसावी यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.**



कृषी सप्ताहाचे औचित्य साधून वीर वाजेकर माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

## उरणमध्ये संततधार कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

सर्वांच्या सुख-समृद्धी करिता व कल्याणार्थ ब्राम्हण सभा उरण यांच्यातर्फे श्री गणपतीवर अखंड २४ तास संततधार आणि २४ तास अथर्वशीर्ष पठाण कार्यक्रम गणपती चौक येथील गणपती मंदिरात झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात पूजेच्या संकल्पा सहित श्री संजय रवींद्र केळकर गुरुजी रेवदंडा यांनी श्री सिद्धेश पुरुषोत्तम पांडे यांच्या हस्ते करण्यात आली. अध्यक्ष ब्राम्हण सभा उरण व अध्यक्षा महिला मंडळ ब्राम्हण सभा आयोजित करण्यात आले होते.

प्रती वर्षीप्रमाणे श्री गणपतीवर अखंड २४ तास संततधार वअथर्वशीर्ष पठण कार्यक्रम शनिवार(दि. २) सकाळी ६ वाजल्या पासून रविवार (दि. ३)पर्यंत झाला. या वेळी कार्यक्रमास हनुमंत वासुदेव (आर्य), वैभव राईलकर, हेमंत धामणकर, प्रभाकर दाते, धनंजय उपाध्ये, चंद्रकांत दांडेकर, श्रीधर मोहळकर, नरेंद्र उपाध्ये, विराम उपाध्ये, हरिश्चंद्र जुवेकर, चंद्रकांत साठे, नितीन भानजी, ब्राम्हण सभा उरण अध्यक्ष, सदस्य, ब्राम्हण सभा महिला शाखा व सदस्यांचे सहकार्य लाभले.



## जेएनपीएतर्फे बंदराच्या भागधारकांचा सत्कार

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीएने बुधवारी (दि. ५) मेरीटाइम पब्लिक-प्रायव्हेट-पार्टनरशिप कॉन्क्लेव्ह मध्ये जेएनपीए ३३वा वार्षिक पुरस्कार आयोजित केला होता. या पुरस्कार सोहळ्यासाठी केंद्रीय बंदरे, नौकानयन, जलमार्ग आणि पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष वाघ आणि जेएनपीएच्या सर्व विभागांचे प्रमुख आणि भागधारकांच्या उपस्थितीत जेएनपीएच्या वाढीसाठी भागधारक, टर्मिनल ऑपरेटर्स आणि शिपिंग लाईन्सच्या उत्कृष्ट कार्याचा जेएनपीएने सत्कार केला.

केंद्रीय राज्यमंत्री, श्रीपाद नाईक यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आणि जेएनपीएने देशाच्या आर्थिक विकासात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, सर्व



विजेत्यांचे आपापल्या संबंधित श्रेणीत अभूतपूर्व काम केल्याबद्दल त्यांचे मनः पूर्वक अभिनंदन. सर्वांच्या सामूहिक परिश्रमातूनच जेएनपीए कार्यक्षमतेने काम करत आहे.

जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांनी जेएन पोर्ट पुरस्कार विजेत्यांची प्रशंसा केली आणि बंदराच्या विकासातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, आज विविध श्रेणींमध्ये पुरस्कार जिंकणाऱ्या प्रत्येकाला माझ्या शुभेच्छा. मला आशा आहे की आमच्या सहकारी उद्योगातील भागधारकांनी केलेले कार्य केवळ सर्वोत्तम पद्धतींवर प्रकाश टाकणार नाही तर सागरी आणि लॉजिस्टिक क्षेत्रातील आव्हाने आणि घडामोडींवर विचारांची देवाणघेवाण करतील.

या पुरस्कार सोहळयात बंदराच्या विविध भागधारकांच्या उत्कृष्ट योगदानाची दखल घेण्यात आली आहे, ज्यामुळे जेएनपीएला आपल्या विकासाचा मार्ग उंचावण्यास मदत झाली आणि भारतीय सागरी क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळाली. जेएनपीए देशाच्या आर्थिक वाढीसाठी वचनबद्ध आहे आणि एक्झिम व्यापाराला कार्यक्षम सेवा प्रदान करून जागतिक मूल्य पुरवठा साखळीचे नेतृत्व करीत आहे.

## नेरूळमध्ये कांस्यथाळी मसाज

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ प्रभाग क्र. ३५ मध्ये कांस्य थाळी मसाजचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक कार्यकर्ते देवनाथ म्हात्रे यांनी काशी कृष्णा ट्रस्टच्या माध्यमातून आषाढी एकादशीनिमित्त या उपक्रमाचे आयोजन केले आहे. नामालय निवास नेरुळ आरोग्य केंद्रात सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत हे शिबिर होणार आहे.

कांस्याच्या थाळीने मसाज केल्यास त्याचा शरीराला अनेक फायदे होतात. शरीरातील वाताचे प्रमाण कमी होते. शरीरात वाढेली अतिरिक्त उष्णता कमी होते. डोळ्यांच्या स्नायूंना चालना मिळते. मधुमेहामुळे पायाच्या संवेदना कमी होऊ नये म्हणून उपयोगी पडते. निद्रानाशाची समस्या आटोक्यात राहते. पित्ताचा त्रास कमी होते, गुडघेदुखी, टाचदुखी, कंबरदुखी अशा त्रासाचे प्रमाण कमी होते. पायावरची सूज कमी होते. तळव्याला भेगा पडणे तसेच पायाची जळजवळ होणे अशा समस्या कमी होतात, तसेच डोळ्याखालील काळेपणा कमी करण्यासाठी याचा उपयोग होतो. त्यामुळे नागरिकांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आयोजक देवनाथ म्हात्रे यांनी सांगितले.




# पेण, रोह्यात पावसामुळे दाणादाण

## पेणमध्ये दोन जण गेले वाहून, जनजीवन विस्कळीत




(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यात सतत मुसळधार पाऊस पडत असून, नदी, नाल्यांना पूर आला आहे. त्यात तालुक्यातील दोन व्यक्ती वाहून गेल्या. दरम्यान, प्रशासनाने खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

पेण तालुक्यातील मुंगोशी येथील लक्ष्मण काशिनाथ चौरे (वय ४२) हे सोमवारी मासेमारी करण्यासाठी गेले असता पावसाच्या पाण्यात वाहून गेले होते. त्यांचा मृतदेह उरण येथे सापडला. बेलवडे येथील दौलत माया पवार (वय ६०) हे मंगळवारी मासेमारी करण्यासाठी गेले असता तेदेखील पावसाच्या पाण्यात वाहून गेले. मात्र त्यांना शोधण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

पेण तालुक्यातील महलमिरा डोंगर (चांदेपट्टी) येथील २६ कुटुंबांतील ५६जणांना आंबेघर येथील मराठा समाज हॉलमध्ये हलविण्यात आले आहे. तर कांदळेपाडा गावामध्ये पुराचे पाणी घुसून सुमारे ४० घरांचे नुकसान झाले आहे. प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार आणि तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांनी कांदळेपाडा गावातील पूरसदृश परिस्थितीचा पाहाणी करून आढावा घेतला. येथील ग्रामस्थांना शासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी सरपंच मुरलीधर भोईर यांनी या वेळी प्रांताधिकाऱ्यांकडे केली.

दरम्यान, गुरुवारी (दि. ७) एसटी बसने धडक दिल्यामुळे पेण बस स्थानकासमोरील तीन विद्युत खांबांचे नुकसान झाले. त्यामुळे या भागातील वीजपुरवठा खंडित झाला असून विजेचे खांब नव्याने उभे करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे महावितरणचे अभियंता धनंजय पाटील व नंदकुमार जाधव यांनी सांगितले.


दिवसभरात पेण तालुक्यातील रोडे, करंबेली आणि वरसई फाटा येथील प्रत्येकी तीन गोठ्यांचे नुकसान झाले आहे. शहरातील एसटी स्थानक, विक्रम स्टॅंड परिसर, उत्कर्षनगर, म्हाडा कॉलनी आदींसह सखल भागात पाणी साचले होते.

## तिसऱ्या दिवशीही जोर कायम, नगर परिषदेचा सतर्कतेचा इशारा

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशीही मुसळधार पाऊस कायम आहे. गुरुवारी (दि. ७) रोहा तालुक्यात सकाळपासूनच पावसाचा जोर दिसून आला. त्यामुळे कुंडलिका नदी तुडुंब भरून वाहू लागली आहे. या नदीवरील जुना रोहा अष्टमी पुल तिसऱ्या दिवशीही वाहतुकीस बंद ठेवण्यात आला होता.

कुंडलिका नदी दुथडी भरून वाहत असल्याने रोहा अष्टमी जुना पुल बुधवारी वाहतुकीस बंद करण्यात आला होता. तेंव्हापासून नव्या मोठ्या पुलावरुन वाहतूक सुरू आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नगर परिषद कर्मचारी, पोलीस या ठिकाणी तैनात करण्यात आले आहेत. नदीच्या पाण्याची पातळी वाढत असल्याने नगर परिषदेच्या वतीने रोहा व अष्टमी परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



(छाया : महादेव सरसंबे)

## शेलू येथे पाचव्या मजल्यावरून पडून कामगाराचा मृत्यू

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील शेलू गावाच्या हद्दीत बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडून एक कामगार जखमी झाला होता. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला असून बांधकाम व्यवसायिकावर नेरळ पोलीस ठाण्यात सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेलू येथील सुंदरम बिल्डींगच्या साइडवर काम करताना सोमवारी (दि. ४) दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास एका कामगार पाचव्या मजल्यावरून खाली पडून जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना त्या कामगाराचा मृत्यू झाला. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात संबंधीत बांधकाम व्यवसायिकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास हवालदार पिंगळे करीत आहेत.

## दुचाकीची सायकलला धडक ; दोघे जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महार्गावर माणगाव शहरात बुधवारी (दि. ६) रात्री भरधाव वेगात आलेल्या दुचाकीची पाठीमागून धडक बसल्याने सायकलस्वारसह दोघेजण जखमी झाले असून सायकल व दुचाकीचे नुकसान झाले.

गणेश दिघे (वय ३५, रा. निवगण, ता. भोर, जि.पुणे) त्याच्या ताब्यातील दुचाकी (एमएच-१२,जेएल-७९२९) चालवित मुंबई-गोवा महामार्गावरून भरधाव वेगात महाड बाजूकडे जात होते. त्याचवेळी सखाराम भोनकर (वय ६०, रा. वावे, ता. माणगाव) हे सायकलवरून महाड बाजूकडे जात होते. माणगावमधील रातवडकर चायनीज दुकानासमोर बुधवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास दुचाकीने सायकलला पाठीमागून धडक दिली. या अपघातात सायकलस्वार सखाराम भोनकर व दुचाकीस्वार गणेश दिघे जखमी झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात केली असून, अधिक तपास महिला पोलीस नाईक एन. एस. धनावडे या करीत आहेत.

# कर्जतच्या आदिवासी भागात पुन्हा सुरू होणार फिरते दवाखाने


**कर्जत : बातमीदार**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्जत तालुक्यातील आदिवासी भागासाठी दोन फिरते दवाखाने चालविले जात होते. मात्र आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पगार थकल्याने हा फिरता दवाखाना २०१८ मध्ये बंद करण्यात आला होता. आता राष्ट्रीय आरोग्य अभियानने कर्जत तालुक्यातील कशेळे येथे मुख्यालय असलेले हा फिरता दवाखाना पुन्हा सुरू करण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्यांना दिले आहेत, मात्र दहा दिवस लोटले तरी हा फिरता दवाखाना सुरू झालेला नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून कर्जत तालुक्याच्या आदिवासी भागात २०१२पासून फिरता दवाखाना चालविला जात होता. एप्रिल २०१८पासून या युनिटची जबाबदारी पुणे येथील शतायुषी फाउंडेशनकडे देण्यात आली होती. पण पहिल्या दिवसापासून या फाउंडेशनेने पूर्ण महिन्याचा औषध पुरवठा कधीच पुरविला नाही. औषध साठा संपल्यानंतरही या फिरत्या दवाखान्यात रुग्णतपासणी करण्यात येत होती, पण औषध पुरवठा करीत नव्हती. त्यानंतर दोन्ही फिरत्या दवाखान्यातील वैद्यकिय अधिकारी आणि कर्मचारी यांना फाउंडेशनकडून पगार देणे बंद झाले आणि २०१८ मध्ये कर्जत तालुक्यातील दोन्ही फिरत दवाखाने बंद झाले.




(छाया : संतोष पेरणे)



कर्जतचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सी. के. मोरे यांनी ऑगस्ट २०१८ रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई यांना पत्र लिहून नॅशनल मोबईल युनिटबद्दल माहिती कळविली होती. डॉ. देसाई यांनी त्याबाबत आरोग्य संचालक आणि राष्ट्रीय आरोग्य अभियान यांना माहिती दिली होती. दरम्यान, कर्जत तालुक्यातील दोन्ही फिरते दवाखाने चार वर्षांपासून होते.

> **पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील फिरते दवाखाने १ जुलैपासून सुरू करण्याचे आदेश आरोग्य उपसंचालकांनी दिले आहेत. ते का सुरू झाले नाहीत, याची चौकशी केली जाईल. तसेच दोषी आढळल्यास योग्य ती कारवाई होईल.**
> **-डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड**

## वैजाळी शाळेत आरोग्य तपासणी शिबिर



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

माणुसकी प्रतिष्ठान-जितनगर व हाशिवरे हितवर्धक मंडळाची वैजाळी इंग्रजी माध्यम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच मोफत आरोग्य व दंतरोग तपासणी शिबिर घेण्यात आले.

संस्थेच्या अध्यक्षा सरोज डाकी, मुख्याध्यापक प्रतिभा म्हात्रे, प्रज्ञा धसाडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आरोग्य तपासणी शिबिरात सुमारे तीनशे मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार देण्यात आले. माणुसकी प्रतिष्ठानकडून शाळेकरिता दोन प्रथमोपचार पेट्या देण्यात आल्या. या वेळी माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, दंतरोग तज्ज्ञ डॉ. अक्षय कोळी, डॉ. मनोज पाटील, तानाजी आगलावे, फार्मासिस्ट संजय काळेल, उज्वला चव्हाण, यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. राजेंद्र कोळी यांनी आभार मानले.



# अलिबागमधील सारळ पूल झाला कमकुवत

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील बहुचर्चित चोंढी-रेवस मार्गावरील सारळ समुद्र किनाऱ्याजवळील दगडी पूल पुन्हा एकदा कमकुवत म्हणून घोषित करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलावरून वाहने सावकाश चालविण्याचे आवाहन केले आहे. तसे फलक पुलाच्या दोनही बाजूला लावण्यात आले आहेत.

१९८० च्या दशकात सारळ समुद्र किनाऱ्यावर दगडी पूल उभारण्यात आला होता. मागील पाच वर्षे या पुलाच्या धोकादायक स्थितीकडे स्थानिक प्रशासन, प्रसारमाध्यमातून बांधकाम विभागाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न झाला. सुरुवातीला दुर्लक्ष झाले, त्या नंतर हा पूल पाडून नवीन पूल उभारण्यासाठी निधी मंजूर झाला. या पुलाच्या कामासाठी सुमारे ८५ लाख रुपये मंजूर झाल्याचे सांगण्यात आले. तेव्हाही सारळ पुलाच्या दोन्ही बाजूला धोकादायक म्हणून फलक लागले होते. पण प्रत्यक्षात पुलाचे काम सुरू झाले नाही. केवळ कठडे बांधून आणि पुलाखालील भागाचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करून तात्पुरती मलमपट्टी करण्यात आली. मागील दोन वर्षे निसर्ग आणि तौत्के यासारखी चक्रीवादळे येऊन गेली. आमावस्या-पौर्णिमेला येणाऱ्या उधाणाच्या लाटा या पुलाने सहन केल्या. सुदैवाने पुलाचे कोणते नुकसान झाले नाही.




दरम्यान, दोन महिन्यांपूर्वी पुन्हा एकदा सारळ पुलाचे सर्व्हेक्षण झाले. त्यानंतर आता दोन दिवसांपूर्वी हा सारळ पूल पुन्हा धोकादायक म्हणून ठरविण्यात आला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूला सावधानतेच इशारा देणारे फलक लावण्यात आले आहेत. त्यामुळे या सारळ पुलाचे नूतनीकरण किंवा नव्याने पुलाची उभारणी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ही अपेक्षा लवकर पूर्ण व्हावी, अशी प्रतिक्रिया येथे उमटत आहे.

रेवस-करंजा रोरो सेवेच्या पार्श्वभूमीवर पुलावरून वाहतूक वाढणार आहे, त्यामुळे सारळ पुलाचे काम जलदगतीने हाती घेणे आवश्यक आहे.

# नेरळ-माथेरान टॅक्सी संघटनेकडून वृक्षलागवड



**कर्जत : बातमीदार**

नेरळ-माथेरान टॅक्सीचालक मालक सेवाभावी संस्थेने माथेरान घाटातील वॉटरपाइप परिसरातील ओसाड जागेवर वृक्षलागवड करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेचा शुभारंभ संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र कराळे यांच्या हस्ते करण्यात आला.

नेरळ-माथेरान टॅक्सी चालक मालक सेवाभावी संस्था गेल्या दहा वर्षांपासून माथेरानच्या डोंगरात वृक्षलागवड करीत आहे. गेली दहावा वर्षे सातत्याने टॅक्सी संघटना वृक्ष लागवड कार्यक्रम करीत आहेत. नेरळ येथील हुतात्मा चौकापासून या संस्थेच्या सभासदांनी वृक्षलागवड करण्यास सुरुवात केली होती. आता घाटमार्गातील मोकळ्या जागेत वृक्षारोपण करण्याचे नियोजन संस्थेने केले आहे. या मोहिमेचा शुभारंभ वॉटरपाइप परिसरात संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र कारले यांच्या हस्ते करण्यात आला. राजू हजारे, सचिन लोभी, बाळा भागीत आदी पदाधिकाऱ्यांसह सर्व सदस्य या वृक्षलागवड मोहिमेत सहभागी झाले होते.

## कर्जत पालिकेत सफाई कामगारांच्या मुलांची वारसा पद्धतीने नियुक्ती

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषदेच्या आरोग्य विभागातील दोन सफाई कामगार निवृत्त झाले, त्यांच्या मुलांना वारसा पद्धतीने नगर परिषद सेवेत नियुक्त करण्यात आले.

कर्जत नगर परिषदेच्या आस्थापनेवर अशोक गणेश रणदिवे व सुभाष धाऊ सोनावणे हे सफाई कामगार म्हणून काम करत होते. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर अशोक रणदिवे यांचा मुलगा विश्वदीप तर सुभाष सोनावणे यांचा मुलगा प्रज्वल यांना वारसा पद्धतीने सफाई कामगार म्हणून नियुक्ती देण्यात आले आहे. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी व मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली. उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगरसेवक बळवंत घुमरे, कार्यालयीन अधीक्षक जितेंद्र गोसावी, आस्थापना विभाग प्रमुख अविनाश पवार, अभियंता मनिष गायकवाड, आरोग्य विभागाचे सुदाम म्हसे या वेळी उपस्थित होते.



(छाया : विजय मांडे)

## महिला वन डे क्रिकेट मालिका

# भारताने श्रीलंकेला दिला व्हाईट वॉश

**पल्लेकेले : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील महिला क्रिकेट संघात सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत गुरुवारी (दि. ७) भारताने श्रीलंकेला ३-० असा व्हाईट वॉश दिला. तिसऱ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने श्रीलंकेसमोर विजयासाठी २५६ धावांचे आव्हान ठेवले होते. हे आव्हान श्रीलंकेला पेलवले नाही. त्यांचा संपूर्ण संघ २१६ धावांत पॅव्हेलियनमध्ये परतला. भारताकडून राजेश्वरी गायकवाडने तीन तर मेघना सिंह आणि पूजा वस्त्राकर यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. श्रीलंकेकडून निलाक्षी डिसेल्वाने सर्वाधिक ४८ धावा केल्या, तर चामरी आटापटू (४२) हसिनी परेरा (३९) यांनीदेखील प्रतिकार केला.




भारताचे २५६ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. त्यानंतर मात्र चामरी आटापटूने डाव सावरण्यास सुरुवात केली. तिने ४४ धावांची खेळी केली, मात्र कर्णधार हरमनप्रीतने कर्णधार आटापटूला बाद करीत मोठा धक्का दिला. दरम्यान, हसिनी परेराने ३९ धावा करीत डाव सावरला, मात्र राजेश्वरी गायकवाडने परेराला बाद केल्याने श्रीलंकेच्या आशा मावळल्या. त्यानंतर मधल्या फळीला फारशी चमक दाखवता आली नाही. दुसऱ्या बाजूने निलाक्षी डिसेल्वाने नाबाद ४८ धावांची खेळी करीत एकाकी झुंज दिली. अखेर भारताने लंकेचा डाव ४७व्या षटकात २१६ धावांवर संपुष्टात आणला. भारताकडून राजेश्वरी गायकवाडने तीन तर मेघना सिंह आणि पूजा वस्त्राकर यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.

तत्पूर्वी, श्रीलंकेने भारताला नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्यासाठी पाचारण केले. भारताने कर्णधार हरमनप्रीत कौरच्या ७५ धावांच्या खेळीच्या जोरावर श्रीलंकेसमोर २५६ धावांचे आव्हान उभारले. भारताकडून सलामीवीर शेफाली वर्मा (४९) आणि पूजा वस्त्राकर (नाबाद ५६) यांनीदेखील आपले योगदान दिले. श्रीलंकेकडून रणवीरा, रश्मी डिसेल्वा आणि आटापटू यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.

## मलेशिया मास्टर्स बॅडिमटन स्पर्धा

# सिंधू, प्रणॉय, कश्यपची विजयी सलामी

**क्वालालम्पूर : वृत्तसंस्था**

दोन ऑलिम्पिक पदक विजेत्या पीव्ही सिंधूने बुधवारी मलेशिया मास्टर्स बॅडिमटन स्पर्धेच्या पहिल्या फेरीत संघर्षपूर्ण विजय मिळवला, परंतु सायना नेहवालने सलग दुसऱ्या स्पर्धेत सलामीच्या सामन्यातच गाशा गुंडाळला.



महिला एकेरीत सिंधूने चीनच्या ही बिंग जियाओला २१-१३, १७-२१, २१-१५ असे नामोहरम केले आणि दुसरी फेरी गाठली. लंडन ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या सायनाने पहिला गेम जिंकूनही दक्षिण कोरियाच्या किम गा ईयूनविरुद्ध २१-१६, १७-२१, १४-२१ असा पराभव पत्करला. सायना मलेशिया खुल्या स्पर्धेतही पहिल्याच फेरीत गारद झाली होती.

पुरुष एकेरीत एचएस प्रणॉय, बी साईप्रणीत आणि पारुपल्ली कश्यप यांनी दिमाखदार विजयासह दुसरी फेरी गाठली. प्रणॉयने फ्रान्सच्या ब्राइक लेव्हर्डेझला २१-१९, २१-१४ असे नमवले, तसेच प्रणितने ग्युटेमालानच्या केव्हिन कॉर्डनला २१-८, २१-९ असे पराभूत केले. तर कश्यपने मलेशियाच्या टॉमी सुग्यार्तोचा १६-२१, २१-१६, २१-१६ असा पराभव केला. समीर वर्माचे आव्हान मात्र संपुष्टात आले. समीरने चायनीज तैपेईच्या चौथ्या मानांकित चोऊ टीन चेनकडून २१-१०, १२-२१, १४-२१ असा पराभव पत्करला.

महिला दुहेरीत एन सिक्की रेड्डी आणि अश्विनी पोनप्पा जोडीने इंडोनेशियाच्या फॅब्रियाना कुसुमा आणि एमेलिया प्रॅटिवी जोडीकडून १९-२१, २१-१८, १६-२१ अशी हार पत्करली.

# पुण्याचा कुस्तीपटू तनिष्क कदमची सुवर्ण कामगिरी

### भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केले अभिनंदन

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील पैलवान तनिष्क प्रविण कदमने बाहरिन येथे झालेल्या १५ वर्षांखालील आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. तनिष्कने आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या दमदार कामगिरीचे कौतुक भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केले.



चंद्रकांत पाटील यांनी तनिष्कचा फोटो शेअर करत ट्विट केले की, पुणे जिल्ह्याचे सुपुत्र पैलवान तनिष्क प्रविण कदम यांनी बहरिन येथे झालेल्या १५ वर्षांखालील आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. तनिष्क यांचा सर्व पुणेकरांनाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान आहे. मनःपूर्वक अभिनंदन! असे ट्विट केले.

# तेजस्वीन शंकरला राष्ट्रकुलचे तिकीट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठीच्या ॲथलेटिक्स संघात उंच उडीपटू तेजस्वीन शंकरचा सामावेश केला जाईल, असे भारताच्या ॲथलेटिक्स संघटनेने (एएफआय) बुधवारी (दि. ६) दिल्ली उच्च न्यायालयात सांगितले आहे. या क्रीडा स्पर्धेसाठी आवश्यक असलेली सर्व पात्रता सिद्ध करून व राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केल्यानंतरही स्पर्धेसाठीच्या संघातून वगळले गेल्यानंतर शंकरने त्याविरोधात न्यायालयात धाव घेतली होती.




दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी पुढील कारवाईसाठी शंकरचे नाव भारतीय ऑलिंपिक संघटनेकडे पाठवण्याचे निर्देश दिले होते, तर ऑलिंपिक संघटनेने शंकरची संघातील निवडीसाठी शिफारस केली होती. रिले स्पर्धेसाठी भारतीय दलाचा भाग असलेल्या एका खेळाडूला अपात्र ठरवण्यात आले आहे, ज्यामुळे संघात एक जागा रिक्त झाली आहे. त्यामुळे आता अपात्र ठरलेल्या खेळाडूच्या जागी ३६ सदस्यीय संघात तेजस्वीन शंकरचे नाव पाठवले जाईल, असे एएफआयच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले आहे. तरीही न्यायालयाची या प्रकरणी सुनावणी अद्याप बाकी असून, ती २५ ऑगस्ट रोजी होणार आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २८ जुलै ते ८ ऑगस्टदरम्यान बर्मिंगहॅम येथे होणार आहेत. एएफआयचे वकील हृषिकेश बरुआ कोर्टासमोर अधिक विस्तृतपणे बोलताना म्हणाले की, ४ बाय ४०० मीटर रिले संघाचा सदस्य असणाऱ्या ए. राजीव याला अपात्र ठरवण्यात आले आहे, त्यामुळे त्याच्या जागी शंकर या प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करेल.

# पी. टी. उषांनी ऑलिम्पिकमध्ये रचला होता इतिहास

**मुंबई : प्रतिनिधी**

केरळच्या कोझिकोट जिल्ह्यातील एका छोट्या गावात जन्मलेल्या पी. टी. उषा यांनी ॲथलेटिक्समध्ये भारताकडून दमदार कामगिरी केली आहे. पी. टी. उषा या 'उडन परी' या नावानेदेखील ओळखल्या जातात. त्यांनी तीन ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. आता पी. टी. उषा यांना राज्यसभेची उमेदवारी मिळाली आहे.

पी. टी. उषा या ॲथलेटिक्समध्ये ऑलिम्पिक फायनल खेळणारी पहिल्या महिला ॲथलीट आहेत. त्यांनी १९८४च्या लॉस एंजलिस ऑलिम्पिकमध्येही ऐतिहासिक कामगिरी केली होती. त्यांनी वर्ल्ड ज्युनियर इनव्हिटेशन मीट, आशिया चॅम्पियनशिप, आशिया गेम्सयाबरोबर अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये मेडल मिळवले आहे.


पी. टी. उषा यांनी निवृत्तीनंतर उषा स्कूल ऑफ ॲथलेटिक्सची सुरुवात केली. त्या आता गुणवान खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी आणि सुविधा पुरवतात. पी. टी. उषा यांना अर्जून आणि पद्मश्री पुरस्कारही मिळाला आहे.

# विश्रांती दिली तर फॉर्म परत येईलच कसा?

### विराट आणि रोहितला वगळल्याने इरफान पठाण नाराज

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंड दौरा संपल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर जाणार आहे. तिथे दोन्ही देशांदरम्यान तीन एकदिवसीय आणि पाच टी २० समान्यांच्या दोन मालिका खेळवल्या जाणार आहेत. त्यापैकी एकदिवसीय मालिकेसाठी बुधवारी (दि. ६) भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. या मालिकेसाठी नियमित कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहलीसह अनेक वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे, तर शिखर धवनच्या नेतृत्वाखाली नवीन खेळाडूंचा भरणा असलेला संघ कॅरेबियन बेटांवर जाणार आहे. वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्याच्या निवड समितीच्या या निर्णयावर माजी गोलंदाज इरफान पठाणने नाराजी व्यक्त केली आहे.




भरगच्च वेळापत्रकामुळे गेल्या काही मालिकांमध्ये भारताला संघ निवडीत सातत्य राखता आलेले नाही. २२ जुलैपासून वेस्ट इंडिज विरुद्धच्या होणाऱ्या एकदिवसीय मालिकेसाठी निवडलेल्या १६ सदस्यीय संघामध्ये ही गोष्ट प्रतिबिंबित झाली. भारताने विराट कोहली, रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, ऋषभ पंत, हार्दिक पंड्या, मोहम्मद शामी आणि जखमी केएल राहुल यांना विश्रांती दिली आहे. यापैकी विराट कोहली आणि रोहित शर्मा सध्या खराब फॉर्मशी झुंज देत आहेत.

यावर्षी ऑस्ट्रेलियामध्ये होणाऱ्या टी२० विश्वचषकापूर्वी हे दोन्ही खेळाडू फॉर्ममध्ये परत येणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना अधिकाधिक क्रिकेट खेळावे लागणार आहे. असे असूनही त्यांना संघातून वगळल्याने माजी भारतीय गोलंदाज इरफान पठाणने आश्चर्य व्यक्त केले आहे. इरफानने निवड समितीच्या या निर्णयाचा समाचार घेतला आहे. खेळाडूंना विश्रांती दिली तर ते फॉर्ममध्ये परतणार नाहीत, असे ट्वीट त्याने केले आहे.

# कॅप्टन कूल धोनीचे इंग्लंडमध्ये बर्थडे सेलिब्रेशन



**इंग्लंड : वृत्तसंस्था**

भारतीय संघाला आपल्या नेतृत्वाखाली दोन विश्वचषक जिंकून देणाऱ्या महेंद्रसिंग धोनीने गुरुवारी (दि. ७) आपला ४१वा वाढदिवस इंग्लंडमध्ये खास पद्धतीने साजरा केला आहे. धोनी आणि साक्षीचा लग्नाचा वाढदिवस ४ जुलैला होता. दोघांच्या लग्नाला १२ वर्षे झाली आहे. हे दोघे सुट्ट्यांसाठी इंग्लंडला गेले आहेत. तिथे दोघांनी लग्नाचा आणि धोनीचा वाढदिवस साजरा केला.

धोनीच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनचा व्हिडिओ आणि फोटो साक्षीने स्वतः इंस्टाग्रामवर शेअर केले आहेत. साक्षीने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये धोनी आधी मेणबत्ती विझवतो आणि त्यानंतर दोन्ही हातांनी चाकू धरून केक कापताना दिसत आहे. धोनीने १५ ऑगस्ट २०२० रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. धोनीने टीम इंडियासाठी शेवटचा सामना २०१९ वर्ल्डकपमध्ये खेळला होता. माही आयपीएलमध्ये खेळत असून सध्या चेन्नई संघाचा कर्णधारही आहे. भारतीय संघाचा सर्वांत यशस्वी कर्णधार होता. त्याच्या नेतृत्वाखाली देशासाठी तीन आयसीसी स्पर्धा जिंकल्या आहेत. धोनीच्या नेतृत्वाखाली प्रथम २००७ टी-२० विश्वचषक, २०११ मध्ये एकदिवसीय विश्वचषक आणि त्यानंतर २०१३मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. या तिन्ही स्पर्धा जिंकणारा धोनी जगातील एकमेव कर्णधार आहे.

# माजी क्रिकेटपटू पुन्हा उतरणार मैदानात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

समालोचन किंवा विविध क्रीडा वाहिन्यांवरील कार्यक्रमांच्यानिमित्त निवृत्त झालेले अनेक दिग्गज क्रिकेटपटू आपल्याला नव्याने दिसतात, मात्र, आता या खेळाडूंना पुन्हा मैदानावर उतरण्याची संधी मिळणार आहे. लिजेंड्स क्रिकेट लीग स्पर्धेच्या दुसऱ्या सत्राची घोषणा करण्यात आली आहे. यंदा या स्पर्धेत चार संघ सहभागी होणार असून ११० आंतरराष्ट्रीय खेळाडू खेळताना दिसणार आहेत. वीरेंद्र सेहवाग, इरफान पठाण आणि युसूफ पठाण यांसारखे माजी भारतीय क्रिकेटपटूदेखील लेजेंड्स क्रिकेट लीगच्या (एसएलसी) दुसऱ्या सत्रात खेळताना दिसणार आहेत.

यंदा ही स्पर्धा ओमानमध्ये, २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. भारताचे माजी प्रशिक्षक आणि लिजेंड्स क्रिकेट लीगचे आयुक्त रवी शास्त्री म्हणाले, दिग्गजांना पुन्हा मैदानावर उतरण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या सत्रात जगभरातील अव्वल माजी क्रिकेटपटू एकत्र खेळताना दिसणार आहेत. स्पर्धेच्या पहिल्या सत्रात भारत, पाकिस्तान, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या माजी क्रिकेटपटूंनी भारत, आशियाई आणि उर्वरित जग या तीन संघांचे प्रतिनिधित्व केले होते. या वेळी इंडियन प्रीमियर लीगच्या धर्तीवर चार फ्रँचायझींचे संघ सहभागी होतील.

एलएलसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमण रहेजा म्हणाले की, आम्ही वेळ आल्यावर सर्व माहिती जाहीर करू. आमच्याकडे सध्या ११० खेळाडू आहेत ज्यांना ऑगस्टच्या सुरुवातीला चार संघांमध्ये विभागले जाईल. या स्पर्धेत भारताव्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंकेचे खेळाडू सहभागी होणार आहेत.







हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✻ E-mail : ramprahar@gmail.com ✻ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**